
# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक

डिसेंबर २०२२

## नफ़रत छोड़ो, भारत जोड़ो!!!




अन्नपूर्णा परिवार
ANNAPURNA PARIWAR
Dada Purao Research and Training Institute
*Publication of Inclusive Finance
*A study on usage of mobiles by Annapurna Members.

# अनुक्रमणिका


* संपादकीय – *सुरेश धोपेश्वरकर*
* गांधीजींची प्रार्थना सभा आणि राम नाम! – *अरुण खोरे*
* स्त्रियांना सबल करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान – *डॉ. अजित मगदूम*
* एक होत्या इलाबेन – *डॉ. मेधा पुरव सामंत*
* हिंदू धर्म, धार्मिकता – *प्रा. नीलम पंडित*
* संवाद वाढवायला हवा – *तमन्ना मुजुमदार*
* आग्रह : राष्ट्र अबाधित राहण्यासाठी – *संकेत मुनोत*
* धम्माची समाजासाठी गरज आणि धम्माची जबाबदारी – *परिमल माया सुधाकर*
* धर्म, धार्मिकता आणि धर्मांधता! – *प्रमोद मुजुमदार*
* आता फक्त आठवणीतच... माझी सखी-सहचारिणी गेल ऑम्व्हेट – *भारत पाटणकर*
* कुमार शिराळकर : माणूसपणाच्या वाटेवरचा प्रवासी – *सुभाष थोरात*
* संजीव साने सच्चा मित्र व कार्यकर्ता – *जगदीश खैरालिया*
* अन्नपूर्णाच्या पेन्शन योजनेने माझे म्हातारपण सुरक्षित केले – *शांताबाई सांबरे*
* इथे स्वप्न साकार होतात – *सुरेखा परब*
* अन्नपूर्णा वार्तापत्र... – *अंजली पाटील*



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **कॉ. सुरेश धोपेश्वरकर**
- **वृषाली मगदूम**
- **अंजली पाटील**
- **बाळासाहेब पिसाळ**



**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


**संपादकीय**

## नफरत छोडो

*– सुरेश धोपेश्वरकर*

जगभर आणि भारतभर 'नफरत छोडो' हे वादळवारं घोंगावत आहे.

रशिया आणि युक्रेनच्या युद्धात 'नफरत छोडो' 'हत्यार फेक दो बात करो' असा धावा जगभरची शांतताप्रेमी जनता करीत आहे.

इराणमध्ये हिजाबच्या निमित्ताने धर्मांध शासनाने एका मुलीची तुरुंगात डांबून जी हत्या केली त्या ठिकाणी महिलांप्रति धर्मांधता 'नफरत छोडो' असा इशारा देत लाखो महिला रस्त्यावर उतरल्या आहेत.

१५००० महिलांना फाशी देण्याचा फतवा काढणाऱ्या इराणच्या 'धर्माधिष्ठित' राज्यव्यवस्थेला आव्हान देत महिला म्हणत आहेत 'महिलाओंसे नफरत छोडो' फैज अहमद फैज या पाकिस्तानी कवीचे शब्द गात आहेत, 'हम देखेंगे' पार्लमेंटने मंजुरी दिलेल्या १५००० हजार महिलांच्या फाशीच्या फतव्याला 'सरफरोशी की तमन्ना आज हमारे दिल में है, देखना है जोर कितना बाजू अे कातील में हैं' हे भारतीय कवी बिस्मीलचे गाणे गात भर रस्त्यात येऊन आव्हान देत आहेत.

भारतात राहुल गांधी 'नफरत छोडो'चा नारा देत कन्याकुमारी ते काश्मीर अशी भारत जोडो पदयात्रा काढीत आहेत.

आपल्या शेजारील पाकिस्तानमध्ये इमरान खान लष्कर आणि अमेरिकन हितसंबंधांची साठगाठ आहे, असे सांगत लाँग मार्च काढत आहेत.

इंग्लंडमध्ये हुजूर पक्षाच्या श्रीमती ट्रस यांना ४६ दिवसांच्या अत्यंत अल्पकाळात पंतप्रधान पदावरून पायउतार व्हावे लागले आहे.

भारतातील इन्फोसिस या तंत्रज्ञान कंपनीची स्थापना करणारे नारायण मूर्ती आणि सुधा मूर्ती यांचे जावई ऋषी सुनक यांची निवड हुजूर पक्षाने ब्रिटनच्या पंतप्रधानपदी केली आहे.

अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला काठावरचे बहुमत प्राप्त झाले आहे, तर डेम्रोक्रॅटिक पक्षाचे जो बायडेन यांनी सिनेटवरील पकड घट्ट केली आहे.

इटलीमध्ये हुकूमशहा मुसोलोनीचा विजय असो, अशी घोषणा देणारी महिला पंतप्रधान झाली आहे.

इस्त्रायलमध्ये चार वर्षांत चौथ्यांदा निवडणूक झाली. पुन्हा एक अधांतरी सरकार स्थापन झाले आहे.

आपल्या शेजारील चीनमध्ये क्षी जिनपिंग यांनी राज्यव्यवस्था आणि पक्ष संघटना या दोन्हींवरील आपली पकड घट्ट केली आहे.

इंडोनेशियातील बाली येथील हवामान बदला वरील परिषद नुकतीच संपली आहे. पर्यावरण नाशामुळे झालेले नुकसान आणि

त्याची भरपाई यासाठी यंत्रणा आणि निधी निर्माण केला पाहिजे अशी आशावादी घोषणा करत. या घोषणेची अंमलबजावणी कशी होते त्याबद्दल जागरूक आणि सतर्क राहू या.

जी २० या गटाची पण बैठक झाली. रशिया गैरहजर होता. चीन अमेरिकेचे राष्ट्रप्रमुख यांची एकमेकाशी दोन तास चर्चा झाली. भारत चीन येथील राज्यकर्त्यांनी गळा भेट टाळत फक्त हस्तांलोदनापर्यंत प्रगती केली आहे. दोन महिन्यापूर्वी या दोन राष्ट्रप्रमुखांनी एकमेकांकडे पाठ फिरवून वाटचाल केली होती.

जगातले ताणतणाव कमी होणार कां? संवाद आणि परस्पर सहकार्य वाढणार कां? वर्चस्ववाद आणि सत्तेचा दंभ आणि पिळ कमी होऊन संवादाचे रुपांतर सुंसवादात आणि परस्पर विश्वासात होणार कां हे येत्या काळात ठरणार आहे.

आपण राहात असलेले जग अस्वस्थ आहे. वरील घटनांचा उल्लेख अन्नपूर्णा परिवाराच्या सभासदांना सभोवतालच्या अस्वस्थतेची व्याप्ती किती सर्व दूर पसरलेली आहे, याची कल्पना यावी यासाठी केली आहे.

**जग अस्वस्थ आहे**

कारण जगाची अर्थव्यवस्था अस्वस्थ आहे.

जगातील प्रत्येक देशांतील नागरिकांच्या, कंपन्यांच्या, सरकारांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा वाढला आहे. गेली चाळीस वर्षे सर्व देशांनी अंमलात आणलेल्या जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण (जाखाउ) धोरणांची ही फलनिष्पत्ती आहे.

कर्जे काढून विकास करावयाचा, तर सरकारांवर अनेक देशांत वार्षिक राष्ट्रीय उत्पादनाच्या १०० टक्क्यांपेक्षा जास्त कर्जाचा बोजा आहे.

सैल मुद्रा धोरण म्हणजेच बाजारात स्वस्त व्याज दराने जास्त पैसा सोडून विकास साधावयाचा तर अमेरिका, इंग्लंड, युरोपातील देश इथे गेल्या ४० वर्षातील चलनवाढीच्या दरापेक्षा जास्त चलनवाढ झाली आहे.

चलनवाढ झाल्यामुळे भाववाढीला चालना मिळत राहते. म्हणजे जास्त पैसे खर्च करून कमी प्रमाणात जीवनावश्यक वस्तू खरेदी करता येतात, आपल्यासारख्या कष्टकरी समुदायाचे जीवन अधिक कष्टाचे होते. समाजातील आर्थिक विषमता आणखीनच वाढते.

४० वर्षात जगभर श्रीमंतांना, उद्योगपतींना जास्तीत जास्त करसवलती दिल्याने प्रत्येक देशातील सरकारचे अंदाजपत्रक-बजेट तुटीचे झाले आहे. म्हणजे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती आहे. विविध देशांत ज्यांना गेल्या ४० वर्षांतील आर्थिक धोरणांचा फायदा झाला ते श्रीमंत उद्योगपती नवीन करवाढीचा बोजा अंगावर घ्यावयास तयार नाहीत, प्रसंगी ते करवाढ सुचविणारे सरकारच उलथवून टाकत आहेत. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या आणि विविध देशांच्या अर्थव्यवस्थेमध्ये पेचप्रसंग वाढत आहेत. जागतिक आर्थिक मंदीचे ढग हळूहळू पण निश्चितपणे गडद होत जात आहेत.

या आर्थिक मंदीचा प्रथम सुगावा लागलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचे उत्पादन करणाऱ्या अमेरिकेतील तंत्रज्ञान कंपन्यांनी कंपनी स्तरावर या पेचप्रसंगाचा मुकाबला करण्यासाठी कामगार कपात सुरू केली आहे. ट्विटर, व्हॉट्सॲप, मेटा, फेसबुक, बैजू, मायक्रोसॉफ्ट, गुगल, उबर, ॲमेझॉन अशी नावाजलेली या कंपन्यांची नावे आहेत.

परिणामी पुण्यातील हिंजवाडी आणि नवी मुंबईतील ऐरोली आणि वाशीतील तंत्रज्ञानातील आघाडीच्या किंवा वरील कंपन्यांच्या उपकंपन्यांना यांची झळ पोहोचणार आहे. आपल्या अन्नपूर्णा परिवारातील सभासदांकडून ते घेत असलेल्या छोट्या-मोठ्या सेवांवर त्याच्या वर होणाऱ्या नोकर कपातीचा परिणाम होतो. म्हणून आपण जगाची खबरबात ठेवली पाहिजे.

जग अशा पेचप्रसंगातून जात असतानाच 'चौथ्या औद्योगिक क्रांतीचे' पडघम आणि नगारे वाजू लागले आहेत यंत्रमानव माणसाची जागा घेणार का? रोकड, कॅश, नाण्याची जागा डिजिटल करन्सी घेणार का? लष्करातील सैनिकांऐवजी मानव विरहीत द्रोण या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शत्रूला नमोहरम करणे आणि युद्ध जिंकणे शक्य आहे का?

रशिया आणि युक्रेन यांचे लांबत चाललेले युद्ध, परिणामी अमेरिका युरोपने टाकलेले रशियावरील आर्थिक निर्बंध, रशियाने युरोपची कोंडी करण्यासाठी वाढविलेले इंधनाचे दर, युक्रेनमधून होणारी अन्नधान्याची आवकजावक धिमी होणे, अमेरिका चीन तणावाच्या परिणामी आशिया खंडात होत जाणारी शस्त्रास्त्र स्पर्धा त्यामुळे विकासासाठी आधीच कमी असलेल्या वित्तीय साधनसामुग्रीवर अधिकच बोजा वाढणार आहे.

हे सर्वच पेचप्रसंग, प्रश्न, संवादातून, चर्चेतून सुटू शकतात, शस्त्राच्या युद्धाच्या मार्गाने सुटू शकणार नाहीत. ही महात्मा गांधी आणि नेहरूंची आपल्या भारतीयांना शिकवण आहे. आज जग युद्धाच्या का बुद्धाच्या मार्गाने जाणार हा कळीचा प्रश्न झाला आहे.

त्यामुळे सर्व देशातील राजकीय प्रवासात आपल्याला अस्वस्थता आणि अस्थिरता दिसते. अशा या वातावरणात लघू दृष्टीचे राज्यकर्ते धर्माचा, वंशाचा, भाषेचा, संकुचित राष्ट्रवादाच्या आधारे सत्ताकारण करण्यात मश्गूल आहेत. परिणामी द्वेष, असंतोष, नकारात्मकता, अविश्वासार्हता, नफरत सर्वत्र वाढीस लागली आहे.

त्यामुळे 'नफरत छोडो' या नाऱ्याला जगात आणि देशात प्रतिसाद वाढत आहे.

**जग कूस बदलत आहे**

जगाच्या आर्थिक पुनर्रचनेची वेळ येत आहे किंबहुना आलीच आहे, असे समजणे अधिक योग्य होईल. जुने हितसंबंध तसेच ठेवून नवीन आर्थिक पुनर्रचना शक्य नाही.

उत्पादन कोणासाठी? मार्केट किंवा बाजारव्यवस्था कोणासाठी? पर्यावरण पूरक विकास का पर्यावरणाचा विनाश करून विकास? नवीन तांत्रिक क्रांती (चौथी औद्योगिक क्रांती) कुणासाठी, श्रमिकांचे श्रम अधिक सुसह्य करण्यासाठी का श्रमिकांचे शोषण अधिक

वेगाने, तीव्र करण्यासाठी? नोकर कपात करण्यासाठी? नोकरभरती टाळण्यासाठी आणि धनदांडग्या कंपन्यांचे नफे वाढविण्यासाठी? शासन कुणासाठी सर्व सामान्य नागरिकांसाठी की धनदांडग्या शक्तीचे तुष्टीकरण करण्यासाठी? हे सर्व प्रश्न आज जगभर उफाळून वर येत आहेत म्हणून जगात अस्वस्थता, अस्थिरता आहे. प्रश्न विचारणे शासनकर्त्यांना आवडत नाही; म्हणून विविध प्रकारे दडपशाही केली जात आहे. म्हणून निर्भयपणे 'नफरत छोडो' हा मंत्र स्वत:शी, इतरांशी आणि सर्वदूर उच्चारला पाहिजे.

हा मंत्र उच्चारताना आपल्या मनाला स्वत:च्या स्वार्थाचे, जाती पातीचे, धर्माचे, भाषेचे कुंपण, बंधन पडणार नाही याची सातत्याने काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी स्वत:ला तपासले पाहिजे. आपण जगतो ते जग २४ तास अहोरात्र ३६५ दिवस चालू असते. जग युद्धापासून, विध्वंसापासून वाचवायचे असेल तर जागतिक शांततेसाठी, शस्त्रास्त्र स्पर्धा थांबविण्यासाठी आपण २४ तास जागरूक राहून आपला आवाज बुलंद केला पाहिजे. महात्मा गांधींच्या अहिंसेच्या मार्गाने जगाला नेले पाहिजे.

आपला देश विविध भाषा, धर्म, संस्कृती, चालीरीती यांनी नटलेला आहे. सर्वांच्या एकत्रित, सामुदयिक विकासासाठी आपण भारतीय लोकांनी भारतीय संविधान पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चेअंती नोव्हेंबर १९४९ मध्ये स्वीकारले आहे आणि २६ जानेवारी १९५०ला भारतीय संघराज्याची स्थापना झाली असे घोषित केले आहे.

आपला देश प्रजेच्या म्हणजे १४० कोटी भारतीयांच्या मालकीचा देश आहे. तो लोकांनी दर पाच वर्षांच्या नंतर निवडून दिलेल्या निवडणुकीतून लोकशाही मार्गाने चालावा म्हणून आपण संसदेची लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद, नगरपालीका, ग्रांमपचायत यांची घटनेअंतर्गत निर्मिती केली आहे.

सत्तेसाठी, सर्वंकष सत्तेसाठी, पाडापाडीचा, पक्षफोडीचा, जातधर्माचा, पैशाचा गैरवापर आपल्या राज्यात कसा झाला ते आपण पाहिले आहे. डॉ. आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या संविधानाला आणि पंडित जवाहरलाल नेहरूंनी सक्षमपणे चालविलेल्या संसदीय लोकशाहीची थट्टा मस्करी, टिंगलटवाळी करीत लोकांना हुकूमशाहीच्या दिशेने न्यावयाचा हा डाव आहे.

धर्माच्या विषयी, भारतीय माणसात जी भावुकता, भावविवशता आहे त्याचा गैरवापर करीत धर्मनिरपेक्ष भारताला तिलांजली देऊन धर्माधिष्ठित हिंदू राष्ट्र निर्माण करावयाचे हे राज्यकर्त्याचे धोरण आहे. त्याकरिता हिंदू मुस्लीम दुही माजवायची ही रणनीती आहे. ही रणनीती यशस्वी करण्यासाठी १५ ऑगस्ट १९४७ साली म्हणजे भारत स्वातंत्र झाला त्या वेळी प्रार्थना स्थळांची जी स्थिती होती तशीच जैसे थे स्थिती ठेवावयाची हा संसदेचा कायदा त्यांना उधळून लावावयाचा आहे. यासाठी राममंदिर निर्मितीनंतर काशी, मथुरा असे नवे वाद निर्माण करून सर्वोच्च न्यायालय आणि द्वेषमूलक वातावरण या दोन्ही आयुधाचा वापर केला जात आहे. म्हणूनच १९ ऑगस्ट २०२२ रोजी आपल्या अन्नपूर्णा परिवारातर्फे आपण धर्म, धार्मिकता, धर्मांधता याविषयावर जे चर्चासत्र घेतले त्यातील भाषणे संक्षिप्त स्वरूपात लेख म्हणून या अंकात दिले आहेत.

तसेच सुरेश सावंत याचे अत्यंत सोप्या भाषेत लिहलेले 'धर्म आणि संविधान' हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे.


श्री. अरुण खोरे यांचा गांधीजींवरील लेख, मेधाताईचा इलाबेन भट यांच्यावरील लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकराविषयी डॉ. अजित मगदूम यांचा लेख अन्नपूर्णाच्या यशस्वी पार्टनर शांताबाई आणि सुरेखा परब यांच्या यशोगाथा दिल्या आहेत. ज्यामुळे तुम्ही लिहत्या, वाचत्या आणि बोलक्या व्हाल अशी संपादक मंडळाची अपेक्षा आहे. आशा आहे. अंजली ताई पाटील यांनी अन्नपूर्णा परिवाराची माहिती, घडामोडी वार्तापत्रातून सांगितल्या आहेत. याशिवाय हेरंब कुळकर्णी आणि दिपाली गायकर यांच्या कविता या अंकात प्रसिद्ध केल्या आहेत. मुखपृष्ठ ऋच्याताईंने सजविले आहे.

२१ जानेवारी २०२३ला मुंबईला आणि २८ जानेवारी २०२३ ला पुण्याला आपल्या अन्नपूर्णा परिवाराच्या सर्वसभासदाच्या जंगी मोठ्या सभेत तुम्हाला यावयाचे आहे.

वस्ती वस्तीमध्ये 'नफरत छोडो', 'भारत जोडो' या घोषणा दणदणीत आवाजात देत मोठ्या सभेला या. आपली एकजूट एकमूठ फक्त सभासदांसाठी नाही तर १४० कोटी भारतीयांसाठी आहे. १४० कोटी भारतीयांची सुख-दु:खे आपल्या अन्नपूर्णा परिवाराची सुख दु:खे आहेत. ही जाणीव जागृती वस्ती पातळीवर सातत्याने करा.


**निर्भय-बनो, नफरत-छोडो, भारत-जोडो**

❖❖❖




**भारतीय स्वातंत्र्य संग्रामात महात्माजींबरोबर देशाचे नेतृत्त्व करणारे, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान, संसदिय लोकशाहीचा पाया रचणारे, भारतीय जनतेला आर्थिक विकासात सामावून घेण्यासाठी आर्थिक नियोजनाद्वारे देशाची आर्थिक प्रगती करणारे माननीय पंडित जवाहरलाल नेहरू यांना अन्नपूर्णा परिवारातर्फे विनम्र अभिवादन!**

# गांधीजींची प्रार्थना सभा आणि राम नाम!



■ अरुण खोरे, पुणे.

*(लेखक गांधीजी चरित्र आणि विचारांचे अभ्यासक आहेत.)*



५ ऑगस्ट २०२० रोजी उत्तर प्रदेशातील रामाची जन्मभूमी असलेल्या अयोध्या शहरात राम मंदिराचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या उपस्थितीत झाल्याचा सोहळा आपण सर्वांनीच पाहिला होता.

अशा वेळी माझ्यासारख्या सामान्य भारतीय पत्रकाराला गांधीजींची आठवण येते. या देशात अर्वाचीन काळात ब्रिटिश सत्तेचा अंमल असताना कोट्यवधी भारतीयांच्या मनात रामाचे नाव कोणी रुजवले असेल तर ते गांधीजींनी! आणि म्हणूनच फाळणी काळात नवी दिल्लीच्या परिसरात झालेल्या दंगली, भारताच्या पूर्व सीमेवर झालेल्या अनेक अत्याचारांच्या प्रसंगी प्रार्थना सभा घेऊन गांधीजींनी शांतता प्रस्थापित केली होती. या देशातील सर्वसामान्य भारतीयांच्या मनातील रामाला जागे करणारा हा महात्मा होता. राम मंदिराच्या भूमिपूजनाच्या प्रसंगी गांधीजींची आठवण कोणाला होईल हे संभवत नाही.

मात्र आपण इतके कृतघ्न नाही. आपण गांधीजींचे स्मरण त्यांच्या विचारांनी केले पाहिजे.

**सत्याचे प्रयोग आणि राम**

गांधीजींनी आपल्या आत्मचरित्रात अर्थातच सत्याचे प्रयोग या पुस्तकात सत्य हाच आपला ईश्वर असल्याचे प्रतिपादन करताना लहानपणापासून रामायण कथेचा किती प्रभाव आपल्यावर पडला, हे तपशीलवार सांगितले आहे. विशेषत: श्रावण बाळाचे मातृ-पितृ प्रेम याकडे त्यांनी विशेष निर्देश केला आहे. हे सांगत असताना आपल्या छोट्या–मोठ्या चुकांची कबुली द्यायलाही गांधीजी विसरत नाहीत. त्यामुळे या पुस्तकात व्यापक अर्थाने ईश्वराची किंवा रामाची आठवण त्यांना अनेकदा झाली, हे त्यांनी स्वानुभवाने लिहिले आहे.

लहानपणी मोहनदासने राजा हरिश्चंद्र आणि श्रावणाचे आख्यान बघितले होते. हरिश्चंद्राचे अखिल बघितल्यानंतर आपणही सत्यवादी का होऊ नये, असे त्यांच्या मनात आले. गांधीजींनी लिहिले आहे,''हे माझ्या मनात सृष्टीत हरिश्चंद्र आणि श्रावण आजही जिवंत आहेत आजसुद्धा मी ती नाटके वाचली तर आजही मला अश्रू येतील असे वाटते.''

याच पुस्तकातील 'वडिलांचा मृत्यू व माझी नालायकी', हे प्रकरण प्रत्येकाने वाचावे असे आहे. आपल्याला पंधराव्या-सोळाव्या वर्षापर्यंत फारसे धार्मिक शिक्षण मिळाले नाही, असे सांगणार्या गांधीजींनी आपल्या या पुस्तकात हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध, मुस्लीम, जैन आणि शीख या धर्मांच्या अभ्यासाचे मार्ग कुठल्या ग्रंथांनी खुले झाले, सोपे झाले याचे अनेक तपशील सांगितले आहेत. इंग्लंडला बॅरिस्टरीच्या शिक्षणासाठी गेल्यावर आईने दिलेल्या शपथांचे कसे पालन केले याचाही उल्लेख त्यांनी 'सत्याचे प्रयोग' मध्ये केला आहे.

त्यातला एक प्रसंग गांधीजींनी **'निर्बल के बल राम'**, या शीर्षकाच्या एका छोट्या भागात लिहिला आहे. एका बंदरावरील बोटीमध्ये तरुण प्रवाशांचा पत्त्यांचा खेळ सुरू होतो आणि त्यात पुढे काही मोहपाश असतात. तेथे जाईपर्यंत त्यांचा जो मित्र असतो, तो त्यांना म्हणतो, 'अरे तुझ्या अंगात सैतान कसा संचारला! हे तुझं काम नाही. पळून जा!' आपण लज्जित होऊन भानावर आलो. आणि आईपाशी केलेली प्रतिज्ञा मला आठवली, असे त्यांनी लिहिले आहे.

गांधीजींचे धर्मविषयक वाचन प्रचंड होते. भगवद्‌गीता, उपनिषद, जुना करार, नवा करार, गौतम बुद्धांचे चरित्र, कुराण आणि अन्य धर्माशी संबंधित असलेली अनेक ग्रंथसंपदा त्यांनी वाचली होती, अभ्यासली होती. टॉलस्टॉय यांच्या द किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू ,गॉस्पेल इन ब्रीफ, व्हॉट टू डू? या पुस्तकांचा त्यांच्यावर

खूप प्रभाव पडला, असे त्यांनी नमूद केले आहे.

केंद्रात भाजपचे सरकार येण्यापूर्वी प्रदीर्घ काळ काँग्रेसची सरकारे राज्यात होती आणि दिल्लीतही. गांधीजींचे तोंडदेखले नाव घेण्यापलीकडे या पक्षांच्या सरकारांनी काहीच केले नाही! शाळेच्या अभ्यासक्रमात गांधीजींचे सत्याचे प्रयोग सर्व स्तरांवर अनिवार्य म्हणून अभ्यासायला समाविष्ट करणे अजिबात अवघड नव्हते. पण ते काँग्रेसनेही केले नाही आणि आता तर भाजपचे सगळेच नेते गांधीजींचा किती वृथा अनुनय करतात हे सांगण्याची गरज नाही!

**दिल्लीतील प्रार्थना सभा, नोआखली पदयात्रा**

फाळणी काळात दिल्लीमध्ये, भारताच्या पूर्व सीमेवर आणि पंजाबलगतच्या पश्चिम सीमेवर दंगली उसळल्या होत्या. गांधीजी दिल्लीतील वाल्मीक कॉलनीत मुक्कामाला होते. त्यानंतर काही दिवस कोलकत्ता, बिहार तसेच नोआखली या भागात शांतता प्रस्थापनेसाठी केलेली पदयात्रा आणि शेवटी दिल्लीतील बिर्ला हाऊसमध्ये असताना त्यांची हत्या... गांधीजींचा हा सगळा शेवटचा कालखंड प्यारेलाल यांनी 'द लास्ट फेज' या द्विखंडीय ग्रंथात प्रत्येक दिवसागणिक नोंदलेला आहे. मी लोकमत सोलापूर आवृत्तीत कार्यकारी संपादक म्हणून काम करताना, तिथे 'द हिंदू' नियमितपणे वाचायला मिळत असे.

या दैनिकाने गांधीजींच्या शेवटच्या दोनशे दिवसांची दैनंदिनी प्रकाशित केली. साधारणत: १५ जुलै १९४७ ते ३० जानेवारी १९४८ या काळातील गांधीजींची सगळी वाटचाल आपल्याला तपशीलवार पाहायला मिळते. यानिमित्ताने गांधीजींनी जिथे जिथे प्रार्थना सभा घेतल्या, पदयात्रा केल्या अशा सर्व ठिकाणी त्यांनी जे विचार मांडले, त्याचे चांगले संकलन झाले आहे. या काळात त्यांनी काश्मीरचा दौरा केला. श्रीनगरमधील प्रार्थना सभेला वीस हजार लोकांची गर्दी झाली होती.

(From the pages of The Hindu : Mahatma Gandhi- The Last 200 days).

यातील काही प्रार्थना सभांमधून गांधीजींनी दिवाळी, फटाके, दिवाळीच्या पणत्या आणि आणि रामाचा विजय अशा काही गोष्टींवर थोडेफार भाष्य केले आहे. उद्याच्या राम मंदिर भूमिपूजनाच्या निमित्ताने गांधीजींचे हे विचार आपण समजून घेतले पाहिजेत. पंतप्रधान आणि विविध पक्षांचे नेते, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री या सर्वांनीच गांधीजी संकट काळात काय सांगत होते, याचे भान ठेवले पाहिजे. आणखी एक गोष्ट सांगायला हवी, ती म्हणजे गांधीजींची प्रार्थना सभा ही एका धर्माची नव्हती. ती सर्व धर्मांना सामावणारी, सर्व धर्मांच्या श्रद्धांना, उपासना यांना एकरूप करणारी अशी प्रार्थना सभा होती. त्यामुळे त्यांचा राम हा वेगळा होता. गांधीजींचे हे विचार आपण समजून घेतले नाहीत तर सच्चे भारतीय आपण होऊ शकणार नाही.

'रामनाम हे माझे पेनिसिलिन आहे ', असे त्यांनी एकदा त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टर सुशीला नायर यांना सांगितले. ईश्वराचा शोध म्हणजे सत्याचा शोध, या भूमिकेतून गांधीजी आपले विचार मांडत होते आणि त्यासाठी सत्यनिष्ठ रामाचे प्रतीक समोर ठेवत होते. उपवासाच्या किंवा उपोषणाच्या काळात ते नेहमीच राम नाम जपत असत. ईश्वराला जवळ आणायचे असेल, त्याचा शोध घ्यायचा असेल तर त्यासाठी मुळात गरज आहे अंत:करणातील विशुद्धतेची, असे ते वारंवार सांगत.

'तुमचे हृदय हेच देवालय आहे ', असे या प्रार्थना सभांमधून त्यांनी अनेकदा सांगितले. दिनांक ३१ ऑक्टोबर १९४७ रोजी प्रार्थना सभेत आरंभी दिलीप कुमार रॉय यांनी एक सुंदर भजन म्हटले, ते ऐकून गांधीजी अतिशय खूश झाले. प्रार्थना सभाही निर्विघ्नपणे पार पडली होती.

गांधीजी म्हणाले, 'तुमच्या हृदयरुपी देवालयात प्रेमभाव असला पाहिजे. आता तुम्ही भजन ऐकले त्याचा अर्थ असा आहे की, आपले अंत:करण हे देवालय आहे आणि ते तसे समजून आपण त्यात परस्पराभूती प्रेम ठेवले पाहिजे.'

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काही महिन्यांत फाळणीच्या दंगली शमल्या नव्हत्या. त्यामुळे गांधीजी फिरत होते, संकटग्रस्तांना दिलासा देत होते. प्रार्थना सभेतून शांती - सहिष्णुतेचा संदेश देत होते. नोव्हेंबर १९४७ मध्ये दिवाळीच्या दिवसातील एका प्रार्थनासभेत गांधीजींनी उपस्थितांना सांगितले,

'आपण दिवाळी का साजरी करतो? कारण रामाने रावणावर विजय प्राप्त केला म्हणून. पण भारतात रामराज्य कुठे आहे? मग आपण दिवाळी का साजरी करायची? ज्यांच्या अंत:करणात राम आहे त्यांनी फार तर ती करावी.'

डिसेंबर १९४७ मध्ये दिल्ली आणि पानिपत येथील दंगलग्रस्तांच्या छावण्यांना त्यांनी भेट दिली. त्यानंतरच्या प्रार्थना सभेत बोलताना गांधीजींनी हिंदू-मुस्लीम अशा दोन्ही धर्मातील लोकांना सांगितले की, हिंदूंचे रक्षण मुस्लिमांनी करावे आणि मुस्लिमांचे रक्षण हिंदूंनी करावे. असा विश्वास निर्माण झाला तरच या दंगली थांबतील!

याच प्रचारसभेत बोलताना गांधीजी शेवटी म्हणाले,

'मला तर आपल्या इथे रामराज्य आणायचे आहे. पण तुमचे सहकार्य नसेल तर ते कसे येईल?'

अयोध्येत राममंदिर उभे राहत आहे. आपल्या धर्मनिरपेक्ष अशा देशाचे पंतप्रधान अशा एका नव्या लोकशाही राज्याची पायाभरणी करतील आणि हेच रामराज्य आहे असे घोषित करतील! जे धाडस गांधीजींनी केले नाही; नेहरूंनी तर नाहीच नाही! ते धाडस मात्र विद्यमान राज्यकर्ते करतील आणि आपण सगळे आरत्या- महा आरत्या करत, टाळ्या वाजवीत त्यांच्यामागे उभे राहू!

ही पोस्ट वाचून टीकाटिपणी तुम्ही करालच पण एक लक्षात घ्या माझ्यासारखे कोट्यवधी भारतीय राम - कृष्ण यांना मानतात, त्यांची प्रार्थना करतात. पण म्हणून त्यांच्या श्रद्धेचा गैरफायदा राजकीय शक्तींनी, धार्मिक संघटनांनी घेऊ नये, असे मला वाटते.

❖❖❖

# स्त्रियांना सबल करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

■ डॉ. अजित मगदूम

'मनुस्मृती' हा एक प्राचीन भारतीय हिंदू धर्मशास्त्रातील ग्रंथ आहे. यात अस्पृश्य, शूद्र व स्त्रियांबद्दल अत्यंत अन्यायकारक बंधने किंवा नियम लादले गेले आहेत. मनुस्मृतीत स्त्रियांविषयी आणि शूद्रांविषयी अनेक अपमानास्पद आणि भेदभावाची वादग्रस्त ठरलेली कुवचने आढळून येतात. त्यामुळे महिला, मागासवर्गीय समूह तसेच पुरोगामी, परिवर्तनवादी, समतावादी इत्यादींकडून मनुस्मृतीवर कडाडून टीका केली जाते. मनुस्मृतीमुळे समाजात विषमतेचा पाया रचला गेला हे पुरते अभ्यासल्यामुळे महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी सर्वप्रथम मनुस्मृती ग्रंथाचे जाहीरपणे दहन केले होते. महात्मा फुले यांनी ब्राह्मणांनी चातुर्वर्ण्य म्हणजेच विषमता अबाधित ठेवून त्याआधारे बहुजनांचे शोषण कसे सुरू ठेवले हे त्यांच्या 'ब्राह्मणांचे कसब' या पुस्तकाद्वारे त्या वेळच्या समाजाला लक्षात आणून दिले व त्याविरुद्ध समाजात जागृती निर्माण केली. वर्णभेद, जातिभेद, अन्याय, शोषण या विरुद्ध त्यांनी आवाज उठवला. हीच विचारसरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढे नेत एकूणच भारतीय समाजरचनेचा, तद्नुषंगिक राजकारणाचा मूलभूत अभ्यास करून त्यावर विचार आणि चिंतन केले आहे. एवढ्यावरच न थांबता त्यांनी विषमता, शोषण आणि अन्यायावर नेमके बोट ठेवून त्याविरुद्ध हयातभर संघर्ष केला. समाजातील पिचलेल्या, गांजलेल्या, अन्यायाने त्रस्त झालेल्या दलित वर्गाला माणूस माणूस म्हणून हक्क मिळवून देण्यासाठी लढा दिला. हे करीत असताना दलित स्त्रियांच्यातील सत्व आणि शक्ती यांचं भान आणून दिलं. सबंध स्त्री वर्गाला सन्मान मिळवून देण्याचं महान कार्य डॉ. बाबासाहेब यांनी केलं आहे. प्रस्तुत लेखात स्त्रियांच्या अभ्युदयाविषयी डॉ. बाबासाहेब यांनी जे काम करून ठेवले आहे त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

दलितांना आपल्या मागासपणाची जाणीव जागृती महात्मा फुले यांच्या चळवळीपासून सुरू झाली. अस्पृश्य स्त्रियांचे प्रश्न हे राजकीय स्वरूपाचे प्रश्न आहेत असं डॉ. आंबेडकरांचं ठाम मत होतं. त्यामुळे अस्पृश्यता निवारण झाल्याशिवाय स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत याची त्यांना खात्री होती. त्यासाठी अस्पृश्यता निवारणाच्या कामासाठी स्त्रिया पुढे आल्या पाहिजेत, असं त्यांना वाटे. म्हणूनच त्यांनी अस्पृश्य स्त्रियांच्या वेगळ्या राजकीय परिषदा आयोजित केल्या ज्यामुळे या महिलांच्यात जागृती येऊन त्यांच्या उन्नतीसाठी सामाजिक व राजकीय वातावरण तयार झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, शिक्षण हे परिवर्तनाचे हत्यार आहे. शिक्षणाने माणसात कर्तव्य व हक्कांची जाणीव निर्माण होते. शिक्षणाचे महत्त्व सोप्या भाषेत सांगताना ते म्हणतात, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' पुढे ते एके ठिकाणी म्हणतात 'आमच्या सर्व दुखण्यावर उच्च शिक्षण हेच एकमेव औषध आहे'. स्त्रियांना ते कळकळीने सांगत की, मुलांना शिक्षण द्या, त्यांच्या मनात महत्त्वाकांक्षा जागृत करा, ते थोर पुरुष होणार आहेत असे त्यांच्या मनावर बिंबवा. आपल्याला जातीयतेचे व भुकेचे चटके सोसावे लागले तसे आपल्या मुलाबाळांना सोसावे लागू नयेत म्हणून त्यांना शिकवले पाहिजे हा त्यांचा संदेश स्त्रियांनी शिरसावंद्य मानला. स्त्रियांनी देवधर्म व्रतवैकल्य सोडून शिक्षणाची कास धरली. म्हणूनच बौद्ध निरक्षर स्त्रिया मुलाबाळांना भाकरी थापतानासुद्धा अभ्यासाला जवळ बसवीत. शांताबाई दाणी, सुलोचना डोंगरे यासारख्या शिक्षित महिलांनी त्या वेळी झोकून देऊन हे जागृतीचे काम केले. त्याचे फलित आज अनेक कार्यालयात, आस्थापनात, विद्यापीठात मोठमोठ्या जागांवर दलित बौद्ध समाजातील लोक असलेले पाहायला मिळतात. स्त्रियांच्या शोषणाचे मूळ हे आपल्या जातिव्यवस्थेत आहे हा विचार सैद्धांतिक पातळीवर त्यांनी मांडला. स्त्रिया जातिव्यवस्थेचे प्रवेशद्वार असून स्त्रीदास्य मजबूत करण्याचे काम जातिव्यवस्था करते असे ते म्हणतात. जातिव्यवस्थेचे स्वरूप सोप्या शब्दात सांगताना डॉ. आंबेडकर यांनी जातिव्यवस्थेला जिना नसणारी इमारत अशी उपमा दिली आहे. हे ज्याच्याअभावी एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाता येत नाही. श्रेणीबद्ध आणि बंदिस्त अशा प्रकारची जातिव्यवस्था प्रचलित होती. या जातिव्यवस्थेच्या वरवंट्याखाली विशेषत: आदिवासी दलित स्त्रिया भरडून जात होत्या. हे ओळखून त्यांनी स्त्रियांमध्ये नवविचारांची जागृती निर्माण करण्याचे काम केले इतर स्त्रियां इतके मनोधैर्य, करारीपणा आणि हिंमत दलित स्त्रियांमध्येही आहे असे ते ठणकावून सांगत. ज्ञानार्जन करण्याचा प्रत्येक मानवाला जन्मसिद्ध हक्कच आहे. परंतु तो हक्क स्त्रियांपासून हिरावून घेतला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. आंबेडकर हे संविधान तयार करणाऱ्या मसुदा समितीचे अध्यक्ष आणि कायदामंत्री या नात्याने त्यांना देशाची राज्यघटना तयार करण्याची संधी मिळाली, तेव्हा त्यांनी स्त्रियांना किमान स्वातंत्र्य, न्याय, समता व कायदेशीर संरक्षण मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

मनुस्मृतीने स्त्रीला कोणतेही स्वातंत्र्य, हक्क, अधिकार नाकारलेले होते. स्त्रियांवर अनेक निर्बंध लादून त्या कायम दास्यात राहाव्यात अशी मनुस्मृतीत अटकळ होती. हे निर्बंध नष्ट करण्यासाठी डॉक्टर आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला. हे बिल मंजूर व्हावे म्हणून त्यांनी त्याचा प्रचार पुरस्कार केला. देशभर या बिलाच्या समर्थनासाठी शेकडो सभा घेतल्या. जुने कृषी वर्चस्ववादी कायदे त्यांना अमान्य होते म्हणून या बिलात स्त्रियांना किमान समता आणि स्वातंत्र्य बहाल करणारे कायदे आणण्याचा प्रयत्न होता. अर्थात या बिलास अनेक प्रतिगामी विचारांच्या लोकांचा मोठा विरोध होता. परंतु त्यांना हे बिल येण्यासाठी एक मोठी लढाई करावी लागली या संदर्भात नेहरूंना पाठवलेल्या पत्रात ते लिहितात आपण या बिलाला अत्यंत महत्त्व देतो आणि विरोधकांची समजूत काढण्यासाठी अहर्निश प्रयत्न करून ते मंजूर करावे अशी माझी तीव्र इच्छा आहे याचा अर्थ भारतीय स्त्रियांची पुरुषसत्ताकतेच्या तुरुंगातून मुक्ती व्हावी हाच एकमेव हेतू डॉ. बाबासाहेबांच्या मनात होता.

डॉ. बाबासाहेबांचं हिंदू कोड बिल हे १९५२ मध्ये अखेरीस मागे घेण्यात आले. यामुळे डॉ. बाबासाहेब यांच्या मनावर आघात झाला आणि परिणामी त्यांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. पण १९५२ नंतर या बिलाचे वेगवेगळे तुकडे करून ते मान्य करून घेण्यात आले. तथापि याचे सारे श्रेय डॉ. बाबासाहेबांनाच जाते. हे हिंदू कोड बिल म्हणजे भारतीय स्त्रियांना दिलेली एक अमूल्य भेट आहे.

काय आहे हे 'हिंदू कोड बिल'?

हिंदू कोड बिल हा कायदा म्हणजे स्त्रियांना मिळालेली त्यांच्या न्याय्य हक्कांची व अधिकारांची सनदच होय. या कायद्यामुळे स्त्रीला घर आणि समाजातील पुरुषी वर्चस्ववादापासून मुक्तता मिळाली आहे. या कायद्याने भारतीय स्त्रीला प्रतिष्ठा आणि सन्मान प्राप्त करून दिला आहे. या कायद्यातील महत्त्वाचे मुद्दे खालील प्रमाणे:

- स्त्रीला घटस्फोट देण्याचा अधिकार आहे.
- नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगीचा अधिकार आहे.
- पहिली पत्नी जिवंत असताना पतीने दुसरे लग्न केले तर पहिली पत्नी न्यायालयात दाद मागू शकते.
- स्त्रियांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार असायला हवा
- मुलांप्रमाणे मुलींना दत्तक जाण्याचा अधिकार मिळावा.
- स्त्रियांचा स्वत:च्या मिळकतीवर अधिकार आहे.
- मुलीला वारस होण्याचा अधिकार आहे.
- आंतरजातीय विवाह करण्याचा अधिकार आहे.
- स्त्रीला स्वत:चा वारस निश्चित करण्याचा अधिकार आहे.


स्त्रियांच्या आयुष्यभरात ज्या ज्या टप्प्यावर ज्या ज्या कारणांना स्त्रीची अडवणूक, कोंडी होते नेमका त्याच मुद्द्यांचा विचार करून स्त्रीला न्याय देणाऱ्या कलमांचा समावेश या बिलात बाबासाहेबांनी केला. याबरोबरच स्त्रीला मिळणारी तीन महिन्यांची भर पगारी प्रसूती रजेची तरतूद या कायद्यात आहे. खरं बघायला गेलं तर आज तीन महिन्यांची प्रसूती रजा घेणाऱ्या किती महिलांना हे माहीत आहे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यामुळे हा हक्क त्यांना प्राप्त झाला आहे. एवढेच नव्हे तर पतीने शारीरिक किंवा मानसिक छळ केला, तरीही कायद्याचा धाक ती दाखवू शकते.

डॉ. आंबेडकरांच्या शिवाय भारतातील कुठलाही पुरुष नेत्यानें एवढ्या पोटतिडकीने लढा देऊन असे हक्क महिलांना प्राप्त करून दिले असते का हा प्रश्न मनात येतो.

केवळ दलितांच्याच नवे, तर भारतीय सकल समाजाला आपल्या न्याय्य हक्कांची आणि अधिकारांची जाणीव करून ती मिळवण्यासाठी रात्रंदिवस झिजलेले डॉ. बाबासाहेबांसारखे द्रष्टे विचारवंत नेतृत्व मिळालं यामुळंच आपली लोकशाही स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दिमाखाने साजरा करीत आहे.

❖❖❖

**।। अभिनंदन ।।**



**अन्नपूर्णा परिवाराचे विश्वस्त**
**कॉ. सुरेश धोपेश्वरकर यांना**
**कॉ. श्रीपाद अमृत डांगे स्मृती पुरस्कार**
**२६ नोव्हेंबर २०२२ रोजी सोलापूर येथे,**
**भूतपूर्व केंद्रीय गृहमंत्री श्री. सुशिल कुमार शिंदे**
**यांच्या हस्ते देण्यात येणार आहे.**
**बँक कर्मचाऱ्यांच्या व अन्य कामगारांच्या**
**चळवळीतील योगदानाबद्दल हा पुरस्कार बँक**
**ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन,**
**औरंगाबाद यांच्यातर्फे देण्यात येणार आहे.**

# एक होत्या इलाबेन

■ डॉ. मेधा पुरव सामंत



पद्मभूषण, मॅगसेसे अवॉर्ड विजेत्या इलाबेन भट असे एक अद्भुत व्यक्तिमत्व आपल्यामध्ये होऊन गेलं. नुकत्याच त्या काळाच्या पडद्याआड गेल्या.

स्वातंत्र्यापूर्वीच्या जमान्यात, १९३३ साली जन्माला आलेल्या, महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित अशा आई बनलीला व्यास व प्रसिद्ध सुमंतरराय यांची तीन कन्यांमधील मधली कन्या. ज्या तेव्हाच्या काळात बीए, एलएलबी होऊन पुन्हा इस्त्राएल येथे जाऊन लेबर व कोऑपरेटिव्ह यांचा तीन महिन्यांचा डिप्लोमा करून आलेल्या इलाबेन.

१९५५ साली मुंबईच्या एसनडीटी युनिव्हर्सिटी मध्ये इंग्लिश भाषा शिकवायला सुरूवात करणाऱ्या इलाबेन. त्यानंतर १९५६ साली रमेश भट यांच्याशी विवाह झाल्यावर परत गुजरातम मध्ये येऊन गुजरात गव्हर्मेंट मध्ये काही काळ काम केल्यानंतर, टेक्सटाइल लेबर असोसिएशनच्या महिला विंगच्या प्रमुख झाल्या, ते १९६८ पर्यंत.

दोन मुलांच्या जन्मानंतर १९७१ साली इस्त्राएला जाऊन लेबर व कोऑपरेटिव्हचा डिप्लोमा करून आल्या. त्यानंतर त्यांनी ''सेल्फ एम्पलॉइड विमेन्स असोसिएशन'' (SEWA) ही महिला कामगारांची संघटना १९७२ साली स्थापन केली. त्याच्या जनरल सेक्रेटरी झाल्या, आणि १९९६ सालापर्यंत म्हणजे एकूण २४ वर्ष या संघटनेचे नेतृत्त्व त्यांनी केलं.

ह्या काळात इलाबेनच्या सहृदय नजरेला दिसले की, महिला कामगार ज्या कापड गिरण्यांमध्ये काम करत होत्या, त्यांना रोजी रोटी साठी इतर ठिकाणी सुद्धा काम करावे लागत होते. परंतु कायदा मात्र फक्त कारखान्यात काम करणाऱ्या महिलांना संरक्षण देत होता, आणि स्वयंरोजगारी महिलांकडे दुर्लक्ष करत होता.

या स्वयंरोजगारी महिलांच्या विविध कोऑपरेटिव्ह आणि संघटना इलाबेन नी बांधल्या आणि त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी त्या आयुष्यभर झटल्या.

स्वयंरोजगारी महिलांच्या तुटपुंज्या उत्पन्नातून त्यांना बचत करता यावी, त्यांना गरज असेल तेव्हा कर्ज मिळावे व त्यांच्या आर्थिक विकास व्हावा यासाठी इलाबेंन नी 'सेवा बँकेची' स्थापना केली व 'सेवा बँकेच्या' आर्थिक विकास या दोन गोष्टींसाठी इला बेन त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत कटिबद्ध राहिल्या.

१९७९ साली विमेन्स वर्ल्ड बँकिंगची त्यांनी स्थापना केली आणि १९८० ते १९९८ पर्यंत त्या ह्या बँकेच्या चेअर पर्सन राहिल्या. ह्याच माध्यमातून त्यांनी फ्रेंड्स ऑफ वर्ल्ड विमेन बँकिंगची स्थापना केली. या संस्थेच्या शाखा भारतभर आहेत. आणि छोट्या छोट्या लघुवित्त देणाऱ्या अेक संस्थांना फ्रेंड्स ऑफ वर्ल्ड विमेन बँकिंग यांनी मदत केली आहे. फ्रेंड्स ऑफ वर्ल्ड विमेन बँकिंग या संस्थेने अन्नपूर्णा परिवाराला सुद्धा आर्थिक व तांत्रिक मदत केली आहे. त्याबद्दल अन्नपूर्णा परिवार

त्यांचे ऋणी आहे. अनन्या फायनान्स ही त्यांची सर्वात तरुण वित्त संस्था. याच्याशी सुद्धा अन्नपूर्णा परिवार संबंधित आहे. एकंदरीतच सेवा बँक, एफ डब्ल्यू डब्ल्यू बी, अनन्या ह्या इलाबेन यांनी स्थापन केलेल्या वित्त संस्था व त्यांच्या सहवासात घडलेल्या त्यांच्या उजव्या, डाव्या हात विजयालक्ष्मी दास आणि जयश्री बेन व्यास ह्या सर्वांशी वैयक्तिक माझे व अन्नपूर्णा परिवाराचे जिव्हाळ्याचे नाते जुळलेले आहे. दुर्दैवाने विजयालक्ष्मी दास यांचा मृत्यू दोन वर्षापूर्वी झाला, तोही ईलाबेन यांना मोठा धक्का होता.

इलाबेन यांना पाच विद्यापीठांची मानद डॉक्टर मिळालेली आहे. हारव्हर्ड, जॉज टाऊन, ब्रसेल, येल आणि नाताळ युनिव्हर्सिटी. आशिया खंडातील सर्वोच्च पुरस्कार रॅमन मॅगसेसे हाही त्यांना मिळालेल्या आहे. राईट टू लाईव्हीली हूड अवॉर्ड तसेच भारत सरकारचा पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार यांनी त्या सन्मानित आहेत. परंतु इलाबेनचे वैशिष्ट्य असे की त्यानी यापैकी कुठल्याच पुरस्कारामुळे स्वत: ला उच्च मानले नाही. साधी राहणी उच्च विचारसरणी हे तत्त्व त्यांनी पूर्णत: अंगीकारले होते.

गरिबात गरिब महिलांसोबत मिसळताना, वावरताना त्या इतक्या उच्चविद्याविभूषित आणि सन्मानित आहेत याची जाणीव सुद्धा कोणाला होऊ नये इतकं त्यांचं साधं वागणं असे.

इलाबेन यांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेबद्दल बोलायचं झालं, तर हीलरी क्लिंटन यांनी त्यांचा उल्लेख माझी हिरो असा केलेला आहे.

नेल्सन मंडेला यांनी २००७ साली ''द एल्डरस'' नावाची संघटना स्थापन केली, त्यात त्यांनी इलाबेन यांना निमंत्रित केलं होतं. या संघटनेच्या पदाधिकारी म्हणून इलाबेन २०२२ पर्यंत कार्यरत होत्या. जगभरातील अनेक देशातील, सर्वाधिक गुंतागुंतीचे प्रश्न सोडवण्यासाठी या संघटनेने कार्य केलेले आहे. या संघटनेच्या वतीने इलाबेन अनेक देशात फिरल्या २०१० साली त्या गाझापट्टीत जाऊन आल्या. त्यानंतर त्यांनी असे वक्तव्य केले, की अन्यायाच्या विरुद्ध लढण्यासाठी जास्त कष्ट घेण्याची गरज आहे, ना की लढण्याची! जे भित्रे असतात, तेच शस्त्रांचा वापर करतात! हा त्यांच्या शब्दातून त्यांच्या गांधीवादी तत्त्वावरचा दृढ विश्वास दिसून येतो, आणि त्यांची निर्भीड वृत्ती दिसून येते.

२०११ साली त्यांना इंदिरा गांधी शांतता पुरस्काराने ही सन्मानित केले गेले. राज्यसभा तसेच प्लॅनिग कमिशन वरही इलाबेननी काम केले.

अशा या साध्यासुध्या दिसणाऱ्या, परंतु अत्यंत बुद्धीमान , करारी व तेजस्वी अशा इलाबेन यांना भेटण्याची, त्यांच्यासोबत वार्तालाप करण्याची संधी मला अनेकदा मिळाली. २००९ साली मायक्रो फायनान्स क्षेत्रातले ''उत्कृष्ट महिला नेतृत्त्व'' असा पुरस्कार ईलाबेन यांच्या हस्ते मिळाला. त्यावेळी त्यांनी माझ्या पाठीवर घातलेली शाल, ही मायेची शाल माझ्याकडे आजही आहे. दोन अडीच वर्षापूर्वी 'अनन्या' या त्यांच्या स्थापित संस्थेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त अहमदाबादला मी गेले होते. त्यावेळी इलाबेन यांची शेवटची गाठ पडली.

त्या मला नेहमीच विचारत ''हमारी अन्नपूणर्आ बेन कैसी है?'' माझ्या आई पद्मश्री प्रेमाताई पुरव यांना उद्देशून त्या ''अन्नपूर्णा बेन'' म्हणत. नंतर मला विचारत, ''कितने बहनों को कौनसी सेवाए दि? कैसे चल रहा है अन्नपूर्णा परिवार?'' त्यानंतर थोडसं मिश्कील पणे हसून त्या म्हणत, ''आप कितनी लंबी हो गई? मम्मी से लंबी हो गयी क्या?'' मग मीही त्यांना गमतीने उत्तर देई, ''इलाबेन, मै तो कब की मम्मी से लंबी हो गई! लेकिन आपकी जो नजर है ना, वो लंबी नही होगी!'' यावर त्या माझ्या हातात घेऊन दाबून धरत, खूप प्रेमळपणे माझ्याकडे बघून हसत. ते हसू आज ही माझ्या हृदयात ठसले आहे.

इलाबेन नुकत्याच २ नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्यातून निघून गेल्या. परंतु त्यांचा साधेपणा, त्यांचा मीश्कील प्रेमळपणा, कष्टकरी महिलांच्या हक्क आणि विकासासाठीचा त्यांची कटिबद्धता हे आपल्या सोबत कायम राहणार आहे. एखाद्या दंतकथेसारख्या वाटणाऱ्या इलाबेन ह्या जगात आपल्या सोबत वावरल्या होत्या, हे भारावून टाकणार आहे.

इलाबेन ह्यांच्या स्मृतीला अभिवादन, व त्यांचा वसा पुढे चालवू हे आश्वासन.

❖❖❖

# हिंदू धर्म, धार्मिकता

■ प्रा. नीलम पंडित

महाभारतात धर्माची व्याख्या केलेली आहे. 'धारणात् धर्मम इत्याहु :' म्हणजे 'जो सर्वांना एकत्र धरून ठेवतो तो धर्म होय.' धर्म माणसांना संघटित करतो, एकमेकांच्या साह्याने, सोबतीने मूल्यांच्या आधारे सदचारानं जगायला शिकवतो.

म्हणजे माणसाला माणसाशी जोडतो तो धर्म. धर्माच्या नावाने माणसाला एकमेकांशी जोडण्यासाठी ज्या ज्या कृती केल्या जातात ती धार्मिकता आणि धर्माच्या नावाने माणसाला माणसापासून तोडण्यासाठी ज्या ज्या कृती केल्या जातात ती धर्मांधता किंवा त्याला अधर्मही म्हणता येईल.

धार्मिकता ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे. धार्मिकतेलाच जोडून कर्मकांड येतात. अगदी दोन लाख वर्षापूर्वीच्या निएंडरथल मानवसुद्धा मृताच्या दफनाचे कर्मकांड करीत असत. इराकमधील शालिगार येथे ६० हजार वर्षापूर्वीचे थडगे सापडले आहे. त्या थडग्यावर सात प्रकारच्या फुलांचे हार वाहिलेले सापडलेले आहेत. पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासकांच्या मते तो त्यांचा धर्मगुरू असावा.

म्हणजे माणूस पृथ्वीतलावर आहे तेव्हापासून धर्माचे अस्तित्व आहे. माणूस समूहाने, टोळीने जगत होता तेव्हाही अगदी आजच्यासारखी नसली तरी विधिनिषेधांची, श्रद्धांची एक चौकट त्याच्या जगण्याला होतीच.

आहार, निद्रा, मैथुन आणि निवारा ह्या गरजा तो त्याच्या क्षमतेनुसार करत आलाच होता. फक्त त्याला भय होते ते मृत्यूचे. त्याच्या श्रद्धाही या भयाशीच संबंधित होत्या.

माणसाच्या मृत्यूनंतर त्याचे काय होते? ईश्वर, माणसांना मृत्यूनंतर त्यांच्या कर्मानुसार न्याय देतो का? का उपासनेमुळे उदार होऊन माफ करतो? का पाप-पुण्याप्रमाणे स्वर्ग व नरक ह्याकडे माणसाची पाठवणी करतो? का पुनर्जन्म द्यायला लावतो? का आत्म्याला मुक्त करतो? वगैरे प्रश्नांची विविध धर्मांनी, पंथांनी दिलेली विविध उत्तरे आहेत. विशिष्ट धर्मात व पंथात जन्म घेणाऱ्या माणसावर जे संस्कार होतात, त्यातून विशिष्ट व विविध श्रद्धा निर्माण होतात. ही झाली धर्माची एक बाजू.

त्याचबरोबर प्रत्येक धर्माला सामाजिक बाजू असते. प्रत्येक धर्मग्रंथ माणसांनी सामाजिकदृष्ट्या पाळावयाचे रीतिरिवाज, बाळगावयाच्या निष्ठा व नीतिमत्ता ह्यांचे आदर्श व दंडक घालून देतो. प्रत्येक धर्माच्या किंवा पंथाच्या उदयाला सामाजिक परिस्थितीचा कार्यकारणभाव आहे. प्रतिभाशाली विचारवंत व तत्त्वज्ञ ह्यांनी जेव्हा काही विचार मांडले त्यातून काळाच्या ओघात समाजाच्या उद्धाराचे, सामाजिक कोंडी फोडण्याचे किंवा दु:ख व अन्याय निवारण्याचे मार्ग दिसून आले तेव्हा त्यातून धर्म ही संकल्पना उदयाला आली. सर्वच धर्मांचे संस्थापक हे पुरुष आहेत. एकही धर्म महिलांनी स्थापन केलेला नाही.

हिंदू धर्माचा काल सर्वात प्राचीन म्हणजे जवळपास इ. स. पूर्व अडीच ते तीन हजार वर्षे मानला जातो. हिंदूंचे धर्मग्रंथ श्रुती आणि स्मृती अशा दोन सदरांत विभागले गेलेले आहेत. वेद हे श्रुतीग्रंथ होत. त्यांचा अमुक एक कोणी कर्ता नाही. वेद ही ऋषींच्या कानावर पडलेली देववाणी! म्हणूनच त्यांना 'अपौरुषेय' म्हणतात.

हिंदू धर्मामध्ये आप, तेज, वायू, पृथ्वी आणि आकाश ह्या पंचमहाभूतांची पूजा आणि भक्तिभावाचा प्रारंभ आरंभकाळापासून दिसतो. ऋग्वेदातील पंचमहाभूतांच्या पूजनाचे महत्त्व, यजुर्वेदातील यज्ञयाग व कर्मकांडाचे महत्त्व आणि वर्णव्यवस्थेची निर्मितीही याच अनुषंगाने वाचायला, अभ्यासायला मिळते.

आज वर्तमानातही माणसं पंचमहाभूतांना पूजनीय मानतात. पण विज्ञानाच्या आधारे त्यांच्या परस्परसंबंधांचे होणारे परिणाम तपासावे असं त्यांना वाटत नाही. यजुर्वेदातील कर्मकांड आणि यज्ञयाग याला अवास्तव महत्त्व प्राप्त होऊन मजबूत झालेल्या वर्णव्यवस्थेचं आज जरी कायद्याद्वारे उच्चाटन झालं, तरी प्रत्यक्ष व्यवहारात अजूनही जातिभेदांना थारा आहे.

मग पाण्याला स्पर्श केला म्हणून राजस्थानात शिक्षकाच्या मारहाणीत ९ वर्षाच्या तिसरीत शिकणाऱ्या इंदर मेघवाल या दलित विद्यार्थ्याचा मृत्यू होतो. श्रद्धेसाठी जनावरांचे मूत्र प्यायले जाते, पण दलित मुलानं पाण्याच्या माठाला हात लावलेला चालत नाही. दु:ख, संताप, शिक्षा होण्यासाठी योग्य पावले उचलायची सोडून शाळेत आम्ही माठच ठेवत नाही वगैरे गोष्टींची भलामण सुरू होते.

जे वर्णव्यवस्थेबाबतचे वास्तव आहे तेच पुरुषप्रधान व्यवस्थेचेही वास्तव आहे. यज्ञयागात स्त्रीला जागा नसल्यामुळे 'स्त्री ही दुय्यम' ह्या भावनेतून आजही समाज मुक्त झालेला नाही. साहजिकच हिंदू समाजाचे वर्तन आजही वर्णव्यवस्था आणि पुरुषप्रधान व्यवस्थेच्या विळख्यात बंदिस्त झालेलं दिसतं.

खरेतर 'हिंदू असणं' म्हणजे सर्वांना सामावून घेणे. 'हिंदू असणं' म्हणजे सहिष्णुता हे अर्थ मागे पडत वर्णव्यवस्था आणि पुरुषप्रधानता हाच हिंदू असण्याचा अर्थ पद्धतशीरपणे रुजवला गेला.

हिंदू धर्मातील किंबहुना सर्व धर्मातील मानवी मूल्यांची आपल्याला गरज आहे आणि धर्माच्या नावाने जे गैरप्रकार चालू आहेत त्याबद्दल आपण सावध असायला पाहिजे. धर्मामध्ये एक भाग आहे कर्मकांडांचा. कारण सर्वसामान्य माणसाला देवाशी संवाद साधायचा असेल, देवाशी संबंध प्रस्थापित करायचा असेल तर त्याला कर्मकांड लागतं. त्यामुळे कर्मकांड आले, यज्ञ आले, अजान आली, मग चर्चमध्ये प्रथा परंपरा आल्या. हा सगळा कर्मकांडाचा भाग आहे.

कर्मकांडांमध्ये काही चांगल्या, तर काही विकृत गोष्टी आहेत. चांगल्या गोष्टी स्वीकारायला आणि विकृत गोष्टी नाकारायला हव्यात. गांधीजी असे म्हणत, की धर्म हा तुम्ही आणि तुमचा देव यातील संवादाचं माध्यम आहे आणि ती अत्यंत खासगी गोष्ट आहे. ज्याला धर्म मानायचा आहे, ज्याला आराधना करायची आहे त्याने श्रद्धा आणि उपासना ही खासगी बाब मानली पाहिजे आणि दुसऱ्यांच्या श्रद्धा, उपासना, धर्म यांचा आदर केला पाहिजे.

धार्मिकता आणि सहिष्णुता या परस्पर पूरक गोष्टी आहेत. त्यांचा अनुभव सातत्यानं आपल्याला येत असतो.

माझे वैयक्तिक उदाहरण देते. माझी ८२ वर्षांची आई अत्यंत धार्मिक आहे. तिचे ज्ञानेश्वरीचे पारायण नियमितपणे चालू असते. डिसेंबर महिन्यात आम्ही मस्जिद परिचय मेळाव्यात सहभागी होणार होतो. सकाळचा गारठा असल्याने तू आंघोळ नाही केलीस तरी चालेल, असे जेव्हा मी म्हणाले त्यावर 'मंदिरात आंघोळ न करता कधीही जात नाही.' 'मस्जिद म्हणजे मंदिरच, तिथे जातानाही आंघोळ करूनच जाणार.' माझी आई मंदिर दिसलं की जशी हात जोडते तसंच घराजवळच्या चर्चसमोरून जाताना न चुकता हात जोडते. दुसऱ्या धर्माबद्दलचा हा आदर, हे प्रेम कुठून येते तर आपापल्या धर्माने सांगितलेले सद्‌विचार समजणे आणि आत्मसात करणे हीच धार्मिकता होय.

गांधीजी सनातन हिंदू होते, मौलाना आझाद पाच वेळा नमाजाचे पठण करायचे. त्यांनी आणि इतर नेत्यांनी एकमेकांच्या धर्माचा आदर केला, त्याचे फलित म्हणजे भारत धर्मनिरपेक्ष राहिला आहे. यातली महत्त्वाची बाब म्हणजे वैयक्तिक पातळीवर प्रत्येकाला आपापल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य आहे.

ही दूरदृष्टी कुठून आली? तर धर्मात सांगितलेली प्रेम, क्षमा, शांती आणि सद्‌भावना ही मूल्ये त्यांनी फक्त आत्मसात केली नाही, तर ती मूल्ये ते जगले.

भारतात आजची लढाई ही धार्मिकता विरोधात धर्मांधता अशी म्हणता येईल. भारतातील संस्कृती ८ धर्म, ४५०० जाती, २५०० भाषा, एका ठिकाणी बर्फ, दुसरीकडे वाळवंट अशी भौगोलिक विविधता यांनी समृद्ध आहे. बुद्धाचा, गांधींचा अहिंसेचा मार्ग सर्व जगाला प्रेरणादायी आहे.

भारत अखंड आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारताचे संविधान. भारताचे संविधान हे धर्मनिरपेक्षता या वैचारिक पायावर उभे आहे. भारतीय होणे म्हणजे या सर्व धर्म आणि परंपरा यांच्यात जी मानवी मूल्ये सांगितली आहेत, त्यांचा अंगीकार करणे आणि टाकाऊ गोष्टी, परंपरांचा स्वीकार न करणे, आपल्या धर्माइतकेच दुसऱ्या धर्मावर प्रेम करणे, सन्मान आणि आदर राखणे होय. हे करण्यासाठी एकमेकांना समजून घेणे, दुसऱ्या धर्माचे गैरसमज दूर करणे हे काम सतत केले पाहिजे.

वैदिक, अवैदिक, हिंदू, ख्रिश्चन, जैन, यहुदी, मुसलमान, बौद्ध या धर्मांच्या विचारांनी जगायचे असेल, तर कृती करावी लागते. ती कृती वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि देशपातळीवर करावी लागते. धर्माचे पालन करताना आपण मानवतावादी आहोत की वर्णवादी आहोत? विवेकवादी आहोत की अंधश्रद्धाळू आहोत? असे थेट प्रश्न आपण स्वत:ला विचारले पाहिजेत. प्रत्येकाचे विचारस्वातंत्र्य, भाषास्वातंत्र्य, आहारस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य यांचा आदर केला पाहिजे. शिक्षण, ज्ञान, विज्ञान, संशोधन यांसाठी मुक्त अवकाश देणं हे धर्माचं वैशिष्ट्य असायला हवे.

भारतातील संस्कृती इतर संस्कृतींच्या योगदानानेही समृद्ध झाली आहे याचा खुल्या मनाने स्वीकार करू या. महमद पैगंबर आणि येशू ख्रिस्त जेव्हा जिवंत होते तेव्हा त्यांचे शिष्य इथे आले. काहींनी व्यापाराच्या निमित्ताने धर्म आणला, त्या त्या धर्मातील संतांनीही धर्म आणला. ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी आणला, सूफी संतांनी आणला. भारतात हजारो संप्रदाय स्थापन झाले. या सर्वांमुळे इथली संस्कृती समृद्ध बनली.

भारतात हिंदू बहुसंख्य आहेत. त्या सर्व हिंदूंनी धर्मात सांगितलेला प्रेमभाव प्रत्यक्षात उतरवावा. धर्मांधतेला नाकारून धार्मिकतेच्या वाटेवर चालावे, असे हिंदू धर्मात जन्मलेली कार्यकर्ती म्हणून वाटते.

❖❖❖

## कविता

## तू आणि मी...

मी लावतो टिळा
तू लाव टिकली
परंपरेच्या बाजारात
अक्कल आम्ही विकली

मी लावतो भस्म
तू लाव कुंकू
गुलामीचा शंख
दोघे मिळून फुंकू

तू घाल मंगळसूत्र
मी घालतो माळ
मनूने मारलेली रेषा
मनोभावे पाळ

तू घाल बांगड्या
माझ्या हातात गंडा
मुकाट्याने ऐक नाहीतर
आमच्या हातात दंडा

मी घालतो मोजडी
तू जोडवे घाल
सप्तपदीच्या मर्यादेत
जन्मभर चाल

तू घाल अंबाडा
मी शेंडी राखतो
विज्ञानाच्या प्रगतीला
परंपरेने झाकतो

मी घालतो टोपी
तू घाल बुरखा
बायकांच्या गुलामीवर
दोन्हीकडे
एकमत आहे बरं का...!!!

मी धोतरात, तू शालूत
होऊ परंपरेचे दास
साने गुरुजी ते भिडे गुरुजी
महाराष्ट्राचा प्रवास...!!!!!

**- हेरंब कुलकर्णी**

❖❖❖

# संवाद वाढवायला हवा

■ तमन्ना मुजुमदार

धार्मिक विद्वेषाच्या वणव्यात लोकशाही आणि लोक होरपळत असताना धर्म, धार्मिकता आणि धर्मांधता हा विषय निवडायचा आणि वक्त्यांना त्यावर मांडणी करायला आमंत्रित करायचे हे जाणिवा जिवंत असल्याचे उदाहरणच म्हणावे लागते. अन्नपूर्णा परिवाराने हा वारसा नुसता जपलाच नाही तर वेळोवेळी प्रत्यक्ष कृतीतूनही दाखवला आहे. वरील ज्वलंत आणि महत्त्वाच्या विषयावर मांडणी करण्याची मला संधी मिळाली याबद्दल आभार मानायलाच हवे. ऐकणे ही जरी श्रोत्यांची इच्छा असली तरी बोलणे, व्यक्त होणे, माझी व्यथा सहृदयी लोकांसमोर मांडणे ही आजच्या काळातली एक मुसलमान म्हणून माझी निकडीची गरज झालेली आहे. कारण मुसलमानांचा जगण्याचा, वागण्याचा, रोजगाराचा, शिक्षणाचा हक्क जसा नाकारला जात आहे तसा बोलण्याचा हक्क हिरावून घेतला जात आहे. वेदनेची 'आह' जरी निघाली तरी देशद्रोहीचा ठपका बसेल की मॉबलिंचिंगचा बळी ठरेल ही भीती तोंडाला नि:शब्दतेचे टाळे लावत आहे. त्यामुळे अन्नपूर्णा परिवार देत असलेल्या बोलण्याच्या संधीचा मला तुमच्याशी संवाद साधण्यासाठी उपयोग करून घ्यायचा आहे.

२१ वे शतक डिजिटलायझेशन, मायाजाल, मेट्रो, यंत्रमानव अशा अशक्य कल्पना विज्ञानाच्या चमत्काराने प्रत्यक्षात उतरलेल्या असल्या तरी विज्ञानाने 'धर्माचे' मात्र काहीच वाकडे केले नाही. उलट दरदिनी धार्मिक आणि धर्मवाद्यांचा उन्माद नवनवी आव्हाने लोकशाहीयुक्त समाजात पसरवत आहे. विज्ञानाचा उतारा धर्मावर चालत नाही. ही आजच्या घडीला असणारी परिस्थिती मानवजातीला भूषणावह नाही. सगळेच धर्म परिवर्तनाची कास धरायची विसरून समाजाला किती प्रतिगामी बनवता येईल, किती सनातनी बनवता येईल याकडे अधिक लक्ष पुरवत आहेत. राजकारण आणि धार्मिक अस्मितांची मिलीभगत झाली की, समाज केवळ मुक्या-बधिर जित्रापांचा कळप होतो. सत्ताकारण आणि धर्मरक्षक हातात हात घालून समाजाला वांछित दिशेला हाकून नेतात याची इतिहास आणि वर्तमानात अनेक उदाहरणे पाहायला मिळतील.

यंदा भारताने स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी केली. परकीयांच्या बेड्यातून स्वकीयांना आझाद करून पाऊणशतक लोटल्याचा हर्ष भारतीयांच्या मनामनात चमकत आहे. मुसलमान मात्र फाळणीनंतर आपल्याच मातीत, आपल्याच स्वकीयांच्या द्वेषात कैद झाला. पंचाहत्तर वर्षांपासून मुसलमान स्वत:ला भारतीय असल्याचे सिद्ध करण्यासाठी पोटतिडकीने प्रयत्न करतो आहे. न केलेल्या गुन्ह्यांची शिक्षा भोगतो आहे. सामान्यांचा आवाज ज्या नेत्यांपर्यंत कधीही पोहोचत नाही त्या वरच्या नेत्यांनी सामान्यांचा आवाजाचा मुखवटा लावून स्वस्वार्थ, सत्ता हव्यास लपवून देशाची फाळणी केली. देश विभागला. ज्यांना धर्माधारित देश हवा होता ते गेले आणि ज्यांना धर्मनिरपेक्ष, लोकशाहीची आस होती ज्यांची मुळे या मातीत खोलवर रुतली होती व निवडीचा पर्याय झिडकारून याच मातीत दफन होण्याची आस उराशी घेऊन 'भारतीय' म्हणून मानाने मिरवू लागले. हिंदू-मुस्लीम संस्कृती, गंगा जमुनी रिवायत जोपासत

मोहरम आणि दिवाळी मनवत एकमेकांच्या आधाराने जगू लागले. पण धर्माचा ऱ्हास आणि खुर्चीचा हव्यास, मतांचे राजकारण करण्याच्या नादात ध्रुवीकरणाचा अजेंडा अधिक जोरकसपणे राबवणारे अद्यापही तोच चष्मा लावून देशाकडे पाहात आहेत याचा खेद होतो.

या देशाचा खलनायक मुसलमान आणि नायक हिंदुत्ववादी अशी कल्पना रुजू लागली. येनकेनप्रकारेण 'मुसलमान' हा विषय दररोज धगधगत ठेवायचा. सकाळ झाली की 'मुसलमान, मुसलमान' करत लोकांना घाबरवणारे अनेक मुद्दे मुद्दाम पसरवायचे. मुसलमान बोलला तर देशद्रोही, जगण्याचा हक्क मागितला तर मॉबलिंचिंग, रोजगार कमावू लागला तर फळं, भाजीपाला, अन्नपदार्थात थुंकतात म्हणून वाळीत टाकायचे, दाढी-टोपी, बुरखा दिसला की दहशतवादी म्हणायचे, शिक्षणाचा हक्क 'हिजाब काढ' म्हणत नाकारायचे, न्याय मागितला तर बेगुनाह हजारो तरुणांना तुरुंगात अडकवून ठेवायचे, महिला सुरक्षितता देतो म्हणून बिल्कीस बानोसारखी सरेआम मजाक बनवून ठेवायचा, प्रार्थना हक्क बजावावा तर 'भोंगा भोंगा' करत गोंधळ घालायचे... एक ना अनेक! किती उदाहरणे द्यावी. चारी बाजूने कोंडी करून हैराण केलेय. भारतीय मुसलमानांना तरी बरं! उपकार आहेत संविधान निर्मात्यांचे, संविधानाने मुसलमान म्हणून का असेना, पण नागरिक म्हणून जगण्याची तजवीज करून ठेवली आहे अन्यथा हा धार्मिक विद्वेषाचा कहर आणि दुसरीकडे मरनेके बाद की जन्नत की आस दाखवणाऱ्या मुल्ला-मौलानांमुळे भारतीय मुसलमानांचा मानवीय इतिहास कधीच पुसला गेला असता.

मुसलमान अनेक पंथ, सिलसिले, फिरकेत विभागला आहे. अल्लाह किंवा एकेश्वरवाद हे समान तत्त्व आहे. कुराणाची भाषा अरबी आहे. कुराणाचे हदिस वा धर्माचे आकलन ज्याच्या त्याच्या प्रज्ञेइतके आकलन आहे. त्यापेक्षा कितीतरी बाबतीत तुम्ही अनभिज्ञ आहात. धर्म समजून घेण्याचा ज्याचा वकूबही वेगळा. मेल्यानंतर जन्नत मिळेल त्यासाठी नीतीने वागा, अल्लाहचा शुक्र माना, नमाज, हज, रोजा, जकात, कलमाचा अंगीकार करा, असे प्रबोधन करताना भौतिक जीवनात येणाऱ्या अनेक प्रश्नांना कसे भिडायचे  याचे मार्गदर्शन मिळत नाही. काफीरचा खरा अर्थ काय, महिलांना दर्गा, मस्जिद, कब्रस्तानाात प्रवेश का नाही, बुरखा, हिजाब घालून महिलांनी स्वशिलाचे रक्षण करायचे तर पुरुषांच्या दूषित नजरेवर-नियतवर कोणता पहेरा आहे, जिहादचा खरा अर्थ काय? कुर्बानी प्राण्याचीच का द्यायची, तलाके बिहत कुराणात नसताना आचरणात का, दाढीटोपी, नमाजी असेल तरच तो सच्चा मुसलमान का, आधुनिक शिक्षणाच्या, कौशल्याधारित शिक्षणाच्या किती मदरशात सुविधा आहेत, गरीब, मोलकरीण, कचरावेचक स्त्री बुरखा घालत नाही मग तिच्या पर्द्याची जबाबदारी कोण घेणार? दर्गा मस्जिदकडे जमणारा निधी व्यसनाधीन, बेरोजगार मुस्लीम तरुण-तरुणींसाठी का वापरत नाहीत? स्वत:ला अलिप्त न ठेवता इतर प्रवाहात का मुसलमान सामील होत नाहीत? असे अनेक प्रश्न अनुत्तरित राहिल्याने विकासाच्या वाटेत येणारे अडथळे बाजूला सरत नाहीत याची जबाबदारी घेणारे आणि मार्ग काढणारे पुढे येत नाहीत. योग्य नेतृत्वाचा अभाव मुस्लीम समाजात कायमच राहिला आहे आणि म्हणूनही दोन्ही समाजांत संवाद होत नाही. विचाराचे आदानप्रदान होत नाही. चर्चा घडत नाहीत आणि गैरसमजाचे जाळे मनं कलुषित करत आहे.

इतक्या अंधारातूनही आशेची पहाट फटफटत आहे. तिमिर भेदून प्रकाशकिरणे उद्याची उम्मीद अधिक बळकट करत आहे. थोडा का असेना पण मुस्लीम समाज शिकत आहे. कित्येक जण धर्माला विरोध न करता शांतीने विवेकाची वाट धरत आहेत. अज्ञानाच्या नासमजीच्या कोषातून बाहेर पडून रस्त्यावर इतर बांधवांच्या सोबत प्रवाहात येत आहेत. मस्जिद सर्व धर्मीयांसाठी खुली केली. NRC, CAA च्या आंदोलनात हातात संविधान घेऊन रस्त्यावर उतरले. अलिप्तता त्यागून सांगली, कोल्हापूर महापूर, करोनाकाळात अन्नदान, मानवसेवा करण्यात अग्रस्थानी आले. नातेवाईकांनी नाकारलेली प्रेते आपले बांधव समजून त्या त्या धर्मानुसार अंत्यसंस्कार केले. हिजाब घालून का होईना मुली शिकत आहेत. नाही मिळाली तरुणांना नोकरी तरी छोट्या-मोठ्या स्वयंरोजगाराचा मार्ग निवडून मानाने जगत आहेत. मदरशातून शिकलेले सरकारी परीक्षा पास करून सरकारी अधिकारी होत आहेत. पंक्चरवाला वसीम, रिक्षावाला हमीद, भाजीवाली जैनहा, मोलकरीण नाझिनाभाभी पोटाला चिमटा काढून पोरांना शिकवत आहे. नाही मिळाली सवलत, स्कॉलरशिप तरी नेटाने शिक्षणाची कास धरत आहेत. समजून घेत आहेत, व्यक्त होत नसतील, संकोचत असतील, पण विचार नक्कीच करत आहेत. म्हणून आपला संवाद वाढवायला हवा. एकमेकांशी बोलून चर्चा करून, प्रश्न विचारून नाती अधिक पारदर्शी, अधिक घट्ट व्हायला हवीत म्हणून आपण वेळोवेळी, वारंवार बोलत राहूयात.

❖❖❖

# आग्रह :
# राष्ट्र अबाधित राहण्यासाठी

■ संकेत मुनोत

अन्नपूर्णा संस्थेचे काम पाहून मला खूप आनंद झाला. मुख्य आनंद या गोष्टीचा की गांधीजींच्या प्रत्येक आंदोलनात आणि रचनात्मक कामात दिसायची तशी महिलांची मोठी संख्या इथे दिसते आहे. शिवाय अन्नपूर्णा संस्था ही रचनात्मक कामाचे आदर्श उदाहरण आहे.

आजचा विषय मला दिला तो म्हणजे धर्म, धार्मिकता, धर्मांधता आणि गांधीविचार. माणसाला माणसाशी जोडतो तो धर्म तर माणसापासून माणसाला तोडते ती धर्मांधता. आज धर्मांध लोकांचा आवाज मोठा झाल्याने सगळीकडे धर्माची चुकीची प्रतिमा उभी राहिली आहे. आज बहुतेक धर्मामध्ये त्या धर्माचे चांगले तत्त्वज्ञान सोडून कर्मकांड जास्त वाढले आहे. कर्मकांड हे धर्माच्या १०% च असायला हवे, पण आज कर्मकांड ९०% आणि १० % तत्त्वज्ञान असे सुरू आहे. यासोबतच आज moral values पेक्षा identification values ला जास्त महत्त्व दिले जाते. टिकली, कुंकू, टिळा, टोपी यांच्या सारख्या identification values वर जास्त भर दिला जात आहे तर धर्मात असलेले बंधुभाव, प्रेमसारख्या moral values ला महत्त्व दिले जात नाही. आपल्या देशात अनेक महामानव आणि सुधारक झाले ज्यांनी सत्य आणि परखड विचार मांडले, पण बहुसंख्याक लोकांचा पाठिंबा न मिळाल्याने त्यांचे विचार मोठ्या प्रमाणात अमलात येऊ शकले नाही. पण महात्मा गांधींना जनतेचा मोठा पाठिंबा मिळाल्याने ते मोठा बदल घडवू शकले. म्हणजे महात्मा गांधींच्या मागे जेवढे हिंदू, मुस्लीम आणि अन्य धार्मिक लोक होते त्याच्या १०% सुद्धा त्या काळात स्वत:ला धर्मरक्षक म्हणवणाऱ्या हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मुस्लीम लीगसारख्या धर्मांध संघटनांच्या मागे नव्हते. विशेष म्हणजे महात्मा गांधींना आदर्श मानणारे त्यांच्या विचारांवर चालणारे अनेक मोठे साधू, धर्मगुरू वगैरे तेव्हा मोठ्या प्रमाणात होते जे त्यांच्या अनुयायांना पण उदारमतवादी निर्भय भूमिका घ्यायला सांगत. आचार्य विनोबा भावे, मौलाना आझाद, स्वामी रामानंद तीर्थ, राष्ट्रसंत गाडगेबाबा, जैन साध्वी उज्ज्वलकवरजी, राष्ट्रसंत गाडगेबाबा अशी असंख्य नावे आपणास यासंदर्भात दिसतील.

पण आज याच्या उलटे घडत आहे. बहुतेक धर्मामध्ये मूर्ख संकुचित लोकांनी स्वत:ला त्या धर्माचा साधू म्हणवत द्वेष पसरवणे सुरू केल्याने त्या धर्माचे, समाजाचे आणि देशाचे मोठे नुकसान होत आहे. कालिचरण, सूर्यसागर आणि वेगवेगळ्या धर्मातील अशाच प्रकारचे ढोंगी साधू साध्वी धर्माच्या नावावर समाजात फूट पाडत आहेत. पण याला उत्तर म्हणजे ते चुकीचे म्हणजे धर्मच चुकीचा आणि ते पाळणारे सगळे लोक मूर्ख असा काढता कामा नये. उलट धर्माची उदारमतवादी बाजू समोर आणणे, अशा वेळी जास्त महत्त्वाचे आहे. महात्मा गांधींमुळे धर्मात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या आणि लोक बदलले. राजकारण, समाजकारण, धर्मकारण यामध्ये पूर्वी

फक्त उच्चभ्रू आणि उच्चवर्णीयांचे वर्चस्व होते. गांधींनी ते बदलून सर्व जाती–जमातींना यात नेतृत्व दिले. विशेष म्हणजे जे उच्चवर्णीय होते, तेही मोठ्या प्रमाणात गांधीजींच्या सोबत होते आणि स्वत:चे अधिकार सोडून ते ज्या कामाला हलक्या दर्जाचे काम तेव्हा म्हटले जाई अशी कामे गांधींमुळे करू लागले. यामुळे गोडसेसारखे काही ठरावीक लोक भडकले ज्यांना त्यांचे जातीय वर्चस्व कायम ठेवायचे होते आणि त्यांनी गांधींच्या हत्येचे प्रयत्न सुरू केले.

२५ जून १९३४ मध्ये पुणे येथे गांधींवर पहिला हल्ला झाला जेव्हा त्यांच्या कारवर बॉम्ब फेकण्यात आला. पण नेमकी गांधीजी मागच्या गाडीत बसलेले असल्याने पुढे बसलेला ब्रिटिश अधिकारी जखमी झाला. त्यानंतर १९४२, १९४४ मध्ये दहशतवादी गोडसेने त्यांच्यावर ४ हल्ले केले या ५ ही हल्ल्याच्या वेळेस फाळणी, ५५ कोटी वगैरे काहीही प्रश्न नव्हते, तर हल्ल्याचे एकमेव कारण होते ते गांधींनी चालवलेल्या धर्मसुधारणा आणि त्यांना मिळणारा मोठा जनप्रतिसाद.

आता कोणकोणते बदल घडले ते पाहू. पहिला बदल म्हणजे महिला- या काळात महिला वर्गावर घुंगट, पडदा आणि अनेक परंपरा लादून त्यांना चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित ठेवले जायचे. गांधींनी त्यांना निर्भयपणे रस्त्यावर उतरून आंदोलनात मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यायला लावला शिवाय चरख्यातून हजारो महिलांना रोजगारही दिला. याबद्दलचा सुरुवातीचा प्रसंग प्रेरणादायी आहे. गांधीजींची बिहारमध्ये सभा होती तेव्हा तिथे सम प्रमाणात महिला असतील तरच मी येईन असे गांधी म्हणाले आणि विशेष म्हणजे तिथे ते घडले, पुढे आपल्या देशात महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला तो याचीच परिणती होती. आपल्या पूर्वीही स्वातंत्र्य मिळालेल्या आणि लोकशाही आलेल्या अनेक देशांत महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता त्यासाठी त्यांना मोठा लढा द्यावा लागला. गांधीजींनी केलेल्या लोकचळवळीमुळे तो आपल्याला स्वातंत्र्यासोबतच मिळाला. आता धर्म आणि जातीत कसे बदल घडले ते पाहू. साधे पगडीचे उदाहरण घ्या. ज्याची जेवढ्या जास्त पिळाची पगडी, तेवढी त्याची जात मोठी आणि त्यावरून त्याला येता-जाता नमस्कार केला जाई. महात्मा गांधींनी सगळ्यांना सामान खादी टोपी देऊन ही जात ओळखण्याची पद्धतच मिटवली. हरिजन सहभोजन उपक्रम सुरू केले. हजारो मंदिरे ज्यात आपल्याच लोकांना अस्पृश्य समजून प्रवेश नाकारला जात असे ती गांधीजींच्या आंदोलनामुळे खुली झाली. जिथे उंबरा ओलांडण्याची परवानगी नव्हती. पाणी बाहेर वरतून दिले जायचे तिथे गांधींनी सांगितल्यामुळे भारतभर लोक त्यांना घरात घेऊन सोबत जेवू लागले, मी फक्त आंतरजातीय विवाहातच उपस्थित राहणार या त्यांच्या विचारामुळे हजारो आंतरजातीय विवाह लागले. गांधीजींनी स्वत:च्या मुलाचाही वाई येथे आंतरजातीय विवाह लावला होता तेव्हाही पुण्यातील सनातनी चिडले होते आणि त्यांनी या गांधींचा काही तरी बंदोबस्त केला पाहिजे, असे म्हटले होते.

पण हे सगळे करताना हे लक्षात घ्यावे लागेल की गांधीजींनी हे बदल हळूहळू हृदयपरिवर्तनातून केले होते. आपल्यापैकी बरेच लोक जेव्हा धर्मावर टोकाची टीका करतात तेव्हा त्या धार्मिक व्यक्तीही आपल्यापासून दूर जातात. गांधीजी आणि इतरांमध्ये फरक हा की, इतर लोक ५ पावले पुढे जाऊन मागच्या माणसाला फरफटत त्यांच्या सोबत नेण्याचा प्रयत्न करतात. ज्यामुळे ती माणसे हात सोडून दुसऱ्या दिशेने जातात, तेच गांधीजी त्या लोकांना सोबत घेऊन एक एक पाऊल टाकतात. त्यामुळे जास्त लोक त्यात सहभागी होतात. गांधीजींनी जी धार्मिक स्पेस घेतली होती ती आज आपण गमावली आहे. त्यामुळे आज राम गांधीजींचा नसून तो अडवाणींचा राम बनला आहे. आपल्या देशाचे हिंदू राष्ट्र झाले तर फक्त मुस्लीम आणि ख्रिश्चन यांना दुय्यम स्थान नाही मिळणार तर जैन, बौद्ध, शीख आणि सामान्य हिंदूंची आणि महिलांची अवस्था बिकट होईल. कारण द्वेष करणाऱ्यांना काही तरी लक्ष्य लागते. आज ते मुस्लिमाचा द्वेष करतात, उद्या ते संपल्यावर ख्रिश्चन मग जैन, बौद्ध, सामान्य हिंदू आणि महिलांचा क्रमांक लागेल यापासून वाचायचे असेल तर भारताचे हिंदू राष्ट्र, मुस्लीम राष्ट्र किंवा अन्य कुठल्याही धर्माचे राष्ट्र न बनता हा महात्मा गांधींनी घडवलेले सर्वांचे राष्ट्र कसे अबाधित राहील यासाठी आग्रही राहायला हवे. आज स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात तर याची खूप गरज आहे, कारण आज जाती, धर्म, वर्ग आणि अनेक भेदांच्या मध्ये देश तोडला जायचा प्रयत्न होत आहे. तर चला आपापसात प्रेम आणि संवाद वाढवूया, बदलाची सुरुवात स्वत:पासून करूया.

संकेत मुनोत - ८६६८९७५१७८
email - changalevichar1@gmail.com Knowing Gandhi Global Friends Women Empowerment Movement

❖❖❖

# धम्माची समाजासाठी गरज आणि धम्माची जबाबदारी

■ परिमल माया सुधाकर

धर्म आणि धार्मिक कर्मकांडे हजारो वर्षांपासून मानवी जीवनाचा अविभाज्य अंग आहेत. भारतातील हिंदू धर्मशास्त्रांनुसार प्रत्येक मनुष्याचे समाजातील स्थान व प्रगतीच्या संधी या त्या मनुष्याच्या जन्माच्या वेळीच निश्चित झालेल्या असतात आणि त्या टिकवण्यासाठी धार्मिक कर्मकांडांचे सदैव आयोजन गरजेचे ठरते. प्राचीन धर्मशास्त्रांनी भारतात वर्णव्यवस्था रुजवली आणि त्यातून अत्यंत पोलादी भिंतींची जातिव्यवस्था हा हिंदू धर्माचा व भारतीय समाजाचा मूलभूत पाया झाली. या जातिव्यवस्थेमुळे समाजातील बहुसंख्य जनता तर पिढ्यान्‌पिढ्या गुलामी व हलाखीच्या दारिद्र्यात खितपत पडलीच शिवाय भारतीय राष्ट्राचे गुलाम देशात रूपांतर झाले. भारतीय जनमानसावर जातिव्यवस्थेचा पगडा इतका भयंकर होता व आहे की, हिंदू धर्मात उपजलेली ही व्यवस्था ख्रिश्चियन, इस्लामिक व शीख धर्मीयांमध्येसुद्धा पसरली व मजबूत झाली. या परिस्थितीमुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्माचा त्याग करत बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती आणि देशातील दलितांनासुद्धा त्यांनी यासाठी प्रेरित केले आहे. हिंदू धर्मातील बहुतांश दलित हे पूर्वाश्रमीचे बौद्ध धम्माचे पाईक होते. ज्या वेळी बौद्ध धम्माचा प्रभाव ओसरू लागला व पुनर्जीवित झालेल्या हिंदू धर्माचे वर्चस्व वाढू लागले त्या वेळी तत्कालीन बौद्ध धर्मीयांची कत्तल तरी झाली किंवा त्यांना हिंदू धर्मात सर्वात खालच्या श्रेणीत समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे हिंदू धर्मातील दलित-पददलितांना स्वत:चा सन्मान असलेला व माणुसकीची वागणूक देणारा धर्म स्वीकारायचा असेल तर बौद्ध धम्म हाच सर्वोत्तम पर्याय असल्याची डॉ. आंबेडकरांची भावना झाली होती.

डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग केला, मात्र प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात नैतिक मूल्यांसाठी आणि समाजात सौहार्द व शांततेसाठी धर्माची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले होते. मनुष्य हा मुळात सामाजिक प्राणी आहे आणि त्यानंतर तो राजकीय आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीत सामाजिक नीतिमत्ता आणण्यासाठी धर्माची गरज त्यांनी प्रतिपादित केली होती. प्रत्येक व्यक्ती व समाजासाठी धर्माची आवश्यकता असेल तर हा धर्म नेमका कसा असावा यांवर बाबासाहेबांनी सविस्तर मंथन करत बौद्ध धम्माची निवड केली होती. मनुष्याच्या जीवनातील दु:खांना अत्यंत गांभीर्याने घेत या दु:खांच्या मुळाशी पोहोचण्याचा मार्ग गौतम बुद्धांना आत्मसात झाला अशी मान्यता आहे. गौतम बुद्धांना ज्ञात झालेला मार्ग हाच त्यांचा धम्म म्हणजे धर्म झाला.

बौद्ध धम्मात, म्हणजे गौतम बुद्धांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानात कर्मकांडाला नव्हे, तर मनुष्याच्या अस्तित्वाला महत्त्व देण्यात आल्याची दखल बाबासाहेबांनी घेतली होती. धर्माचे समाजातील स्थान हे कर्मकांडांना तथाकथित दैविक अधिष्ठान मिळवून देणे

नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला तिच्यातील व इतर सर्वांतील मनुष्यत्वाची जाणीव करून देणे होय, असे बाबासाहेबांचे मत होते. बौद्ध धम्मात कर्मकांडाने दु:खे व संकटे नष्ट होतात किंवा पळवून लावता येतात असा ना दावा करण्यात आला आहे ना त्याकरिता विधी-परंपरा सुचवण्यात आल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या दु:खांच्या कारणांचा शोध घेण्याची निकड तेवढी बौद्ध धम्मात अधोरेखित केली आहे. बौद्ध धम्म ज्या प्रकारे कर्मकांडांना नाकारतो, त्याच प्रकारे तो हिंसेलासुद्धा तुच्छ ठरवतो. भारतीय संस्कृती-सभ्यतेत अहिंसा व शांतीच्या मूल्यांना बौद्ध तत्त्वज्ञानाने सर्वप्रथम प्रतिष्ठा मिळवून दिली होती. अन्यथा, गौतम बुद्धांपूर्वी बलाचे प्रयोग व हिंसेचा वापर यांना सामाजिक व्यवहारात केवळ केंद्रीय स्थानच नव्हते तर नैतिक अधिष्ठानदेखील होते. भारतीय समाजात भूतदयेचे मूल्य, म्हणजे आपल्या भोवतालची सृष्टी व प्राणीजीव या सर्वांविषयी आपुलकी व स्नेहभाव, बौद्ध धम्माने रुजवले. त्यानंतर इतर धर्मांनी या मूल्याचा स्वीकार केला.

बौद्ध धम्मात समाजाची सामूहिक नैतिकता, प्रत्येक व्यक्तीची नैतिकता आणि व्यक्ती-व्यक्तींच्या संबंधांतील नैतिकता यामध्ये कुठलाही फरक करण्यात आलेला नाही. त्यामुळे बौद्ध धम्मात दुटप्पीपणाला वाव नाही. बौद्ध धम्मात एकीकडे प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व स्वीकारण्यात आले आहे, तर त्याच्याच जोडीला समतेची प्रतिस्थापनासुद्धा करण्यात आली आहे. समतेच्या मूल्याशिवाय केवळ स्वातंत्र्याच्या मूल्यावर समाजाची बांधणी झाली तर त्यातून विषमतेची विषवल्ली समाजाला विळखा घालू शकते. स्वातंत्र्याला न्यायाचे मूल्य जोडले आणि त्यात बंधुत्वाच्या मूल्याची भर घातली तर समतेच्या तत्त्वावर आधारित समाजाचे निर्माण करणे शक्य आहे. अन्याय व बंधुभाव एकत्र नांदू शकत नाही आणि बंधुभावाच्या भावनेशिवाय समाजात समता निर्माण होऊ शकत नाही. समतेचे तत्त्व हा मानवी मूल्यांचा कळस आणि मानवी संबंधांचा पाया असल्याची अनुभूती बौद्ध धम्माच्या तत्त्वज्ञानातून होते आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता ही बौद्ध धम्माच्या शिकवणीची नैतिक चौकट आहे, जी भारतीय राज्यघटनेचीसुद्धा नैतिक चौकट आहे. कोणत्याही देशासाठी त्या देशाच्या समाजाची नैतिकता व राज्याकरिता निर्धारित करण्यात आलेली नैतिकता एकमेकांपासून भिन्न असून चालत नाही. समाजातील व्यक्तींकरिता धम्माने आणि देशातील नागरिकांकरिता राज्यघटनेने आखलेली नैतिकता परस्परांना छेद देणारी नसावी, तर परस्परांना पूरक अशी असावी लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते धर्माचे समाजातील स्थान आणि राज्यघटनेचे समाजातील स्थान यांच्यात विसंगती व वितुष्टता असेल तर ते राज्य व समाज या दोहोंच्याही हिताविरुद्ध जाणारे ठरेल.

समाजात प्रत्येक व्यक्तीत करुणाभाव, सदसद्‌विवेकबुद्धी आणि बुद्धिप्रामाण्यवाद जागृत करणे व रुजवणे हे धर्माचे कार्य असले पाहिजे. धर्माची दृष्टी ही चिकित्सक असावयास हवी. म्हणजेच, धर्म व विज्ञान यांच्यात कुठलाही संघर्ष असण्याचे कारण असावयास नको. विज्ञान हे सदसद्‌विवेकबुद्धी, चिकित्सकता आणि बुद्धिप्रामाण्यवाद यांवर आधारित असते आणि बौद्ध धम्म ही तत्त्वे स्वीकारतानाच त्याला करुणेची जोड देतो. म्हणूनच बौद्ध धम्माचा विज्ञानाशी व विज्ञानाच्या प्रगतीतून जन्मास आलेल्या आधुनिक मूल्यप्रणालीशी संघर्ष उद्भवत नाही. मनुष्यांना नियंत्रित करणाऱ्या दैवीय शक्तींचे अस्तित्व न स्वीकारणे आणि आत्मा व मेंदू यांच्यातील भेदाभेद अमान्य करणे हा बौद्ध धम्माचा सर्वात मोठा वैज्ञानिक ठेवा आहे. जगातील वास्तविकतेचे भान आणि कल्पनांचे रान मनुष्याच्या मेंदूतच उपजत असते आणि संवादाच्या माध्यमातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते रुजवले जाते. स्वत:च्या मेंदूत वैज्ञानिक वास्तविकता नोंदवायच्या की भ्रामक कल्पनांचे जाळे विणायचे हे सदसद्‌विवेकबुद्धी, चिकित्सकता आणि बुद्धिप्रामाण्यवादाचे निकष लावत ठरवणे प्रत्येक व्यक्तीसाठी शक्य आहे. हा मार्ग समाजातील प्रत्येक व्यक्तीला दाखवण्याचे काम धम्माचे आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या तत्त्वांच्या चौकटीत करुणाभाव जागवत सदसद्‌विवेकबुद्धी, चिकित्सकता आणि बुद्धिप्रामाण्यवादाच्या मूल्यांवर मानवी मेंदूची म्हणजेच मानवी मनाची जडणघडण अधिकाधिक सखोल, संपन्न व सुदृढ करण्याची प्रक्रिया म्हणजे बौद्ध धम्माचे पालन करणे आहे.

(लेखक एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्न्मेंट, पुणे इथे कार्यरत आहेत.)

❖❖❖

# धर्म, धार्मिकता आणि धर्मांधता!

**■ प्रमोद मुजुमदार**

(कॉम्रेड दादा पुरव यांच्या स्मृतिदिनानिमित्त १९ ऑगस्ट २०२२ रोजी पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात वरील विषयावर मांडलेल्या विचारांवर आधारित लेख.)

अन्नपूर्णा परिवार या संस्थेने महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशात आपला विशेष ठसा उमटवला आहे. या संस्थेची सुरुवात १९७५ पासून झाली आहे. अन्नपूर्णा महिला मंडळ पद्मश्री प्रेमाताई पुरव यांनी संस्थेची सुरुवात केली होती. पुढे १९९३ मध्ये या संस्थेचा कार्यविस्तार होऊन अन्नपूर्णा परिवार अधिक जोमाने काम करू लागला. पुढील तीन वर्षांत म्हणजे २०२५ मध्ये अन्नपूर्णा परिवाराच्या वारशाला पन्नास वर्षे पूर्ण होतील. हा सर्व इतिहास नोंदवण्याचे कारण म्हणजे संस्थेचा आणि अन्नपूर्णा परिवाराचे संपूर्ण कार्यक्षेत्र हे मुंबई आणि पुण्यातील गरीब कष्टकरी वस्त्या हे आहे. या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या कष्टकरी स्त्रिया अन्नपूर्णा परिवारात सक्रिय आहेत. किंबहुना या संस्थेचा सर्व कारभार पूर्णपणे स्त्रिया पुढाकार घेऊन सांभाळतात ही बाब सर्व समाजासाठी विशेषत: महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची आहे.

मुंबई आणि पुण्यातील सर्व गरीब वस्त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, या वस्त्यांमध्ये राहणारे नागरिक हे भारतातील सर्व प्रदेशांतून आलेले स्थलांतरित आहेत. देशातील सर्व भाषा बोलणारे, सर्व प्रकारच्या जाती-धर्माचे आहेत. गेल्या ७५ वर्षांचा इतिहास पाहिला तर महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती म्हणजे मुंबई, पुणे एवढेच नाही, तर भारतातील कोणत्याही गरीब वस्तीत जाती अथवा धर्माच्या नावाने हिंसक दंगल क्वचितच घडली. अशा वस्त्यांमध्ये कधी धार्मिक तणाव किंवा हिंसक घटना झाल्या असल्या तरी अशा समाज विघातक घटनांचे सूत्रधार हे गरीब वस्त्यांच्या बाहेरील शहरातील राजकीय संघटना आणि त्यांचे नेते होते, हे सहज लक्षात येईल. गरीब वस्त्यांमध्ये सर्वसामान्य नागरिक हे कायम धार्मिक आणि जातीय सलोखा टिकवतात आणि जोपासतात. त्यासाठी आवश्यक भान या नागरिकांजवळ आहे. गरीब वस्त्यांमध्ये राहणारे लोक आपला धर्म पाळत नाहीत, असे नाही. उलट हे नागरिक आपले धार्मिक रीतिरिवाज आणि धार्मिक आचरण आपल्या जीवनात करत असतात. त्याचप्रमाणे ते आपल्या वस्तीमधील इतर जाती-धर्माच्या लोकांच्या धर्माचरण आणि परंपरांमध्येही सहजपणे सामील होत असतात. हा धार्मिक उदार दृष्टिकोन त्यांच्या जगण्याचा स्थायिभाव आहे. यालाच धार्मिक सलोखा आणि सहिष्णू व्यवहार म्हणतात.

सध्याच्या काळात आपल्या देशातील सहिष्णू वातावरणाला धक्का बसला आहे. या देशातील मुस्लीम माणसे हिंदू धर्मीयांचे शत्रू आहेत, ते राष्ट्रद्रोही नागरिक आहेत, असा अपप्रचार मोठ्या प्रमाणात होत आहे. या प्रचाराचा परिणाम म्हणून देशातील सर्वसामान्य मुस्लिमांवर मोठ्या प्रमाणात अन्याय–अत्याचार केले जात आहेत. अनेक निरपराध मुस्लीम माणसांना केवळ ते मुस्लीम आहेत म्हणून बेभान माणसांचे जमाव ठार मारत आहेत. मुस्लिमांच्या धार्मिक परंपरा, अन्नपदार्थ, पेहराव, जगण्याची पद्धत इत्यादी

प्रत्येक बाबीविषयी आक्षेप घेतले जात आहेत. मुस्लीम समाजातील माणसांना माणूस म्हणून, या देशाचे नागरिक म्हणून मूलभूत अधिकारही नाकारले जात आहेत. आपल्या संपूर्ण देशाला अमानुष बनवले जात आहे. मुस्लीम समाजावरील हे अन्याय–अत्याचार काही सर्वसामान्य हिंदू नागरिक करत नाहीत. धर्मद्वेषाच्या आणि हिंदुत्वाच्या खोट्या भ्रामक कल्पनांचा प्रचार हिंदुत्ववादी पक्ष आणि संघटना करत आम नागरिकांना त्यासाठी भडकवले जात आहे. या कल्पनांच्या प्रभावाखाली आलेले नागरिक हिंदुत्ववादी संघटनांच्या पाठिंब्याने अशा अत्याचार आणि हिंसेच्या घटनांत सहभागी होत आहेत.

हे समाजातील विद्वेषाचे वातावरण आपल्याला मान्य आहे का?

आपण सर्व कोणत्या ना कोणत्या धर्मात–जातीत जन्माला येतो. मात्र कोणत्या जाती/धर्मात जन्म घ्यायचा ते काही आपल्या हातात नाही. ते आपल्या इच्छेवरही अवलंबून नाही. हे लक्षात घेता आपण जन्माला आलेल्या आजच्या समाजातील दुसऱ्या एखाद्या जातीचा किंवा धर्माचा माणूस आपण आपला शत्रू आहे असे का समजावे? अशा समजुतीला किंवा धारणेला खरंतर कोणताही आधार नाही.

देव आणि धर्म ही कल्पना कधी अस्तित्वात आली; याचा विचार केला तर काय दिसते? आज उपलब्ध असलेल्या माहितीनुसार या पृथ्वीवर माणसाची निर्मिती सुमारे दोन लाख वर्षांपूर्वी झाली. मात्र त्यावेळेस म्हणजे दोन लाख वर्षांपूर्वी मानवाला भाषा म्हणजे काय हेसुद्धा माहीत नव्हते. आज पशुपक्षी ज्याप्रमाणे आवाज करून परस्पर संपर्क करतात, त्याप्रमाणे माणूस आवाज आणि चिन्हांच्या साह्याने परस्परांशी संवाद साधत असे. मानवाचा असा संवाद पुढे लाख वर्षे सुरू होता. आज आपण विविध भाषा बोलतो. या भाषांची निर्मितीची सुरुवात सुमारे ७०,००० वर्षांपूर्वी हळूहळू झाली. याचा अर्थ माणसाच्या निर्मितीनंतर सुमारे सव्वा लाख वर्षे माणूस भाषासुद्धा बोलू शकत नव्हता. देव आणि धर्म या गोष्टी तर खूपच दूरच्या गोष्टी. या काळात, म्हणजे भाषा निर्मितीच्या काळात माणूस भटके जीवन जगत होता. गाव, शेती अन्नधान्य निर्मिती याचे कोणतेही तंत्र आणि ज्ञान माणसाला नव्हते. माणसाचे स्थिर जीवन म्हणजेच गाव म्हणून समाज म्हणून जगणे सुरू झाले ते आजपासून १२,००० वर्षांपूर्वी. हा माणसाचा प्रवास विचारात घेतला तर देव आणि धर्म या संकल्पना संपूर्ण माणसाच्या जीवनात किती उशिरा आल्या याची कल्पना करता येईल. आज जगभरात दिसत असणारे एकूण धर्म म्हणजे ख्रिश्चन, मुस्लीम, पारशी, हिंदू, बौद्ध, जैन, शीख, बहाई, लिंगायत तसेच अनेक आदिवासी धर्म परंपरा यांची निर्मिती पाच हजार वर्षांपूर्वीपासून होत गेली; असे इतिहास संशोधन सांगते. जगात संख्येने मोठे असलेले तीन संस्थात्मक धर्म म्हणजे ख्रिश्चन, मुस्लीम आणि बौद्ध हे धर्म विशिष्ट काळात मानवी समाजाच्या गरजेपोटी निर्माण झालेल्या धर्मसंस्था आहेत. हिंदू धर्म हा तशा अर्थाने संघटित संस्थात्मक धर्म नाही. आज भारतीय उपखंडातील स्वत:ला हिंदू समजणारे नागरिक विविध धर्म श्रद्धा बाळगणारे नागरिक आहेत. किंबहुना हिंदू धर्म म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजात विविध प्रकारच्या रीती, परंपरा, धार्मिक व्यवहार आपण पाहू शकतो. त्यांच्यात काही परस्पर भेदही दिसतात, तसेच साधर्म्य दिसते. मात्र तरीही हिंदू धर्म हा या उपखंडातील एक प्रभावी धर्म आहे.

विचार करण्याचा मुद्दा असा की, जगभरात विविध भागांत वेगवेगळे धर्म सामाजिक गरजेपोटी निर्माण झाले आणि टिकले. सर्व धर्मांनी इतिहास कालापासून चार-पाच प्रकारचे कार्य केलेले दिसते. त्यापैकी सर्वात पहिले म्हणजे माणसाच्या व्यक्तिगत ईश्वर श्रद्धा टिकायला मदत केली. धर्माने त्या त्या प्रदेशातील सामान्य नागरिकांमध्ये एकोपा निर्माण केला. त्यामुळे सामाजिक व्यवहार सुलभ झाले. तसेच अनेक वेळा धर्मसंस्थांनी समाजाला पोषक अशा काही सुधारणा घडवून आणल्या. मात्र धर्माचे सर्वात महत्त्वाची भूमिका म्हणजे दीर्घकाळपर्यंत राजकीय सत्तेवर धर्माने नियंत्रण करण्याचे काम करणे. एका विशिष्ट काळापर्यंत म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासापर्यंत आणि औद्योगिक क्रांतीपर्यंत धर्म आणि धर्मसंस्था समाजासाठी महत्त्वाच्या होत्या. वाफेच्या इंजिनाचा शोध आणि त्यानंतर झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे धर्म आणि आधुनिक आर्थिक व्यवहार, आधुनिक समाज यात मोठ्या प्रमाणात अंतर पडले. मानवी जीवन आमूलाग्र बदलले. जगातील प्रगत देशांमध्ये समता, बंधुता आणि स्वातंत्र्य ही मूल्ये या आधुनिक विकासामुळे विकसित झाली. समाजाने ही मूल्ये स्वीकारली. त्यावर आधारित नवीन लोकशाहीवादी समाजांची निर्मिती झाली. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे धर्माशी संबंधित आणि ईश्वराशी संबंधित अनेक कल्पना मुळापासून बदलल्या. सर्वच धर्मांच्या परंपरागत कल्पनांना धक्का बसला. त्यामुळे धर्मसत्ता आणि आधुनिक समाज रचना यात मोठे तणाव निर्माण झाले. हे तणाव कमी अधिक प्रमाणात गेली तीन-चारशे वर्षे सुरूच आहेत. त्याचे आजचे दृश्यस्वरूप म्हणजे जगात ठिकठिकाणी सुरू झालेले धार्मिक तणाव आहेत.

आजच्या आधुनिक समाजात मानवी जीवन सुखकर झाले.

तंत्रज्ञान विकासामुळे मानवी जीवनाला समृद्धी प्राप्त झाली आहे. परंतु ही समृद्धी आणि त्याचे लाभ समाजातील सर्व नागरिकांना समन्याय पद्धतीने मिळू शकलेले नाहीत. किंबहुना गेल्या चार दशकांत वेगाने झालेल्या आर्थिक विकासामुळे जगभरातील सर्व थरांतील नागरिकांच्या जीवनविषयक आकांक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या. या आकांक्षा पूर्ण करण्यात ठिकठिकाणचे सत्ताधारी अपयशी ठरले. प्रचंड बेकारी, महागाई आणि वाढती गरिबी यातून मोठा असंतोष सर्वच देशांत धुमसतो आहे. हा असंतोष काबूत ठेवण्यासाठी जगातील अनेक सत्ताधाऱ्यांनी धर्माचा आधार घेतला. आपल्या देशातील बहुसंख्य धर्माच्या नागरिकांना अल्पसंख्य नागरिक हे तुमचे शत्रू आहेत; असे सांगून त्यांच्यात विद्वेष पेरला. त्यामुळे जगात अनेक ठिकाणी विविध स्वरूपाच्या धार्मिक दंगली आणि धार्मिक तणाव निर्माण झाले. अशा वातावरणामुळे नागरिक आपल्या जीवनातील वास्तविक परिस्थिती (वाढलेली बेकारी, महागाई इत्यादी) काही काळ विसरतात. यासाठीच सत्ताधारी पक्ष धर्माचा आणि धार्मिक हिंसाचाराचा आधार घेत लोकांची दिशाभूल करतात. भारतात नेमके हेच घडत आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

खरंतर आधुनिक जगात धर्म ही संकल्पना वेगाने अलग पडत आहे. जगातील एकूण लोकसंख्येतील विविध धर्मांचे प्रमाण आपण लक्षात घेऊया. आज संपूर्ण जगात मुख्य सहा धर्मांमध्ये जगाची लोकसंख्या विभागली गेली आहे. या लोकसंख्येचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे. ख्रिश्चन धर्म ३१.११%, मुस्लीम धर्मीय २४.९%, हिंदू धर्मीय १५.१६%, बौद्ध ६.६२% तर अन्य म्हणजे पारशी, जैन, शीख चीनमधील पारंपरिक धर्म असे सर्व मिळून ५.६१% तर आदिवासी आणि स्थानिक नागरिकांच्या पारंपरिक श्रद्धा बाळगणारे नागरिक ०.७९% असे आहे. मात्र यातील सर्वात लक्षणीय मुद्दा असा आहे की, लोकसंख्येच्या धर्मानुसार वरील विभागणीमध्ये एक मोठा गट असा आहे त्याची नोंद प्रस्थापित धर्मांमध्ये केली जाऊ शकत नाही. नागरिकांचा हा समूह म्हणजे धर्म न मानणारे किंवा देवाच्या कल्पनेविषयी साशंक असणारे, स्वत:ला 'अज्ञेयवादी' म्हणणारे नागरिक! या नागरिकांचे प्रमाण जगभरात १५.५८% इतके मोठे आहे. हे प्रमाण जगातील हिंदू धर्मीय नागरिकांच्या संख्येपेक्षाही जास्त आहे. म्हणजेच जगातील एकूण धर्माच्या लोकसंख्येच्या क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर हा समूह आहे. कदाचित आपल्याला असे वाटू शकते की, भारतात असे अज्ञेयवादी नागरिक फारसे नसतील. परंतु भारतात अशा अज्ञेयवादी नागरिकांची संख्या सुमारे तीन कोटी इतकी आहे. (ही आकडेवारी प्यू रिसर्च सेंटर या अमेरिकेतील एक प्रतिष्ठित स्वयंसेवी संस्थेने प्रसिद्ध केली आहे.)

वरील वस्तुस्थिती काय दर्शवते? तर आधुनिक तंत्रज्ञान आणि संपर्क साधनांमुळे माणसे अधिक स्वतंत्र विचारांची होत आहेत. धर्म संकल्पना आणि देवाची कल्पना माणसांच्या रोजच्या जीवनात अतिशय मर्यादित प्रमाणात लागू होते. सामाजिक रचना वेगाने बदलत आहेत. उदाहरणार्थ, आजकाल विवाह न करता स्त्री-पुरुषांनी आपल्या इच्छेने एकत्र राहण्याची व्यवस्था सामाजिक पातळीवर स्वीकारली जात आहे. अशा रचनेला 'लिव्ह इन रिलेशनशिप' म्हणतात. जगात आजवर केवळ स्त्री आणि पुरुष असे लैंगिक भेद मानले जात होते. आता भिन्नलिंगी शरीरसंबंधांशिवाय समलिंगी शरीर संबंध हेसुद्धा शास्त्रीयदृष्ट्या योग्य आहेत; असे समाजाने मान्य केले आहे. अशा वेगळ्या लैंगिक धारणा असलेल्या नागरिकांची आजवर मोठी कुचंबणा आजपर्यंत होत होती. आता अशा विविध प्रकारच्या लैंगिक धारणा असलेल्या नागरिकांचे समान हक्क जगात मान्य केले जात आहेत. भारतातही हे हक्क कायद्याने मान्य करण्यात आले आहेत. सांगण्याचा मुद्दा पारंपरिक ईश्वर, धर्म आणि समाज रचना यामध्ये वेगाने बदल होत आहेत. माणूसपणाचा परीघ रुंदावत आहे. याचा अर्थ जगभरात मानवी समाजात मोठे बदलही घडत आहेत. एका नव्या समतावादी, लोकशाहीवादी आणि नागरी स्वातंत्र्याचा विस्तार होण्याच्या कालखंडात आपण पोहोचलो आहोत. आपण आधुनिकतेकडे प्रवास करत आहोत. यामुळे जगातील सर्वच धर्मांच्या नियंत्यांना आपल्या अस्तित्वाला धोका असल्याचे दिसत आहे.

अशा पार्श्वभूमीवर भारतातील धार्मिक तणावाचे आणि धर्मांधतेचे आपण कसे विश्लेषण करणार? केवळ एखादी व्यक्ती केवळ वेगळ्या धर्माची, जातीची आहे म्हणून ती दुय्यम आहे, खालच्या दर्जाची आहे आणि म्हणून आपली शत्रू आहे, आपल्या समाजाची, देशाची वैरी आहे ही कल्पना मान्य करणे म्हणजेच आपण स्वत: अमानुष होणे आहे. एवढेच नाही तर अशा वैर आणि शत्रुत्वामुळे आपण केवळ अल्पसंख्य समाजाच्या नागरिकांवरच अन्याय करत नाही. तर, त्यातून निर्माण होणाऱ्या हिंसक घटना आणि तणावामुळे आपण आपल्या समाजात आणि देशात कायमची अस्थिरता निर्माण करत आहोत. म्हणूनच आपल्या समाजात पसरणारी ही विखारी धर्मांधता रोखायला हवी. आपल्या पुढील पिढ्यांच्या हितासाठी अशा धर्मांधतेविरुद्ध आपण ठामपणे उभे राहायला हवे.

मला वाटते अन्नपूर्णासारख्या कर्तृत्ववान स्त्रियांच्या संस्था या कामात फार महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

- प्रमोद मुजुमदार, सलोखा संपर्क गट ,पुणे. mujumdar.mujumdar@gmail.com

❖❖❖

# आता फक्त आठवणीतच...
# माझी सखी-सहचारिणी
# गेल ऑम्व्हेट



■ **भारत पाटणकर**

तुकोबांच्या एका अभंगातील काही ओळी अशा आहेत,

''भेटीलागी जीवा लागलीसे आस। पाहे रात्री दिवस वाट तुझी ॥१॥''

आयुष्यभर जीवन असे जगलो की आमची दोघांची अवस्था नेहमीच 'भेटीची आस लागलेली' असायची. ''पाहे रात्री दिवस वाट तुझी'' अशीसुद्धा असायची. चळवळीचेच जीवन जगलो कायमचे आणि जीवनाचा बहुतांश हिस्सा अशा अवस्थांमधून जाण्याचाच होता. शेवटची, तिच्या आयुष्याची, दोन-पावणेदोन वर्षे मात्र आम्ही रात्रंदिवस, २४ तासच म्हणावे इतके एकत्र राहिलो. या काळातसुद्धा शेवटी-शेवटी 'भेटीची आस' लागायचीच. कारण जवळ असूनही ती 'भेटण्याच्या' अवस्थेत नसायची. सगळी वाटचाल बंद होण्याकडेच प्रवास झाला.

अखंड वाहणाऱ्या निर्झरासारखीच होती गेल, या शेवटच्या काळापर्यंत. खळखळणारी, संथपणे पण सतत प्रवाही राहणारी. ती जिथून तिथून गेली तिथे तिथे तिने नवनिर्मितीला प्रेरणा दिली. तिथे तिथे तिने जीवन संगीत नित्य नव्या पणाने निर्माण केले. परिसराला आनंदी केले. बेजान वातावरणात जान फुंकत मार्गक्रमण केले. एका जागी साठून राहणं तिला माहीतच नव्हतं. स्वप्न आणि प्रत्यक्ष जीवन परिवर्तनाची सांगड घालत तिने तिची वाटचाल, चारिका तिच्या शेवटच्या काळापर्यंत केली. अनेक युवक-युवतींना तिने निराशेच्या गर्तेतून बाहेर पडण्यासाठी ज्ञानाची शिदोरी पोहोचवली. जीवनावर, मानुषतेवर, माणसांवर, निसर्गावर, गाण्यांवर, संगीतावर डोमाची उधळण करीत राहण्याची प्रेरणा दिली. स्मृतींवर, बोलण्यावर मर्यादा आल्यानंतरही चळवळीच्या, मानुष प्रेमाच्या गाण्यांनी तिचा चेहरा जादू झाल्यासारखा उजळत राहिला. जवळ-जवळ शेवटचा श्वास घेण्यापर्यंत चळवळीची गाणी खड्या आणि मधुर आवाजात आणि लय राखून तिने उत्साहाने म्हटली. मानव मुक्तीच्या उत्सवासाठी वेडी झालेली अशी ही माझी सखी मला सोडून गेली. आठवणी ठेवून गेली. पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देत राहणारे विचार उदंडपणे मागे ठेवून गेली.

गेलनं लिहिलेल्या अनेक पुस्तकांमध्ये, प्रस्तावनेत किंवा अर्पण पत्रिकेत आणि आभारात माझा उल्लेख आहे. पण तिच्या एकाच पुस्तकाची अर्पण पत्रिका फक्त माझ्या नावाची आहे, ''माझे हे पुस्तक मी माझा जीवनसाथी भारत पाटणकर याला अर्पण करत आहे.'' असं म्हटलं आहे. मला यामुळे अभिमान वाटत आला आहे. आमचा एक 'महोब्बत पुरा' होता आणि आज ती नसतानाही आहे, तो या 'बेगमपुरा'बरोबर जोडलेला आहे. बेगमपुराचं रैदासांचं स्वप्न, कबिरांचं स्वप्न, तुकोबांचं स्वप्न हे आमचं झालं होतं. त्यानेच आमच्या 'महोब्बत पुरा'ला जन्म दिला होता. मार्क्स, फुले, आंबेडकर यांनी जे मानव मुक्तीचं स्वप्नं पाहिलं त्याच्या खांद्यावर उभे राहून आम्हाला जे पुढचं स्वप्न दिसलं त्यानं आमच्या महोब्बत पुराला जन्म दिला होता. बुद्धाच्या प्रज्ञा, करुणा, मैत्री, अवैर, प्रतित्य समुत्पाद आणि दु:खमुक्त जगाची निर्मिती या तत्त्वांनी आमच्या महोब्बत पुराला जन्म दिला. या महोब्बत पुराच्या माध्यमातून आम्ही बेगमपुराच्या निर्मितीकडे जाणारी वाट चालू लागलो. ''पोथी पढी पढी जग मुआ। पंडित हुन कोय।। ढाई अखर प्रेम के पढे तो पंडित होय।।'' या कबिराच्या विचारांची प्रेरणा घेऊन आमचा महोब्बत पुरा जन्माला आला.

आम्ही सहजीवन-सहचारिका सुरू केली ती आणीबाणीच्या काळात. मी भूमिगत राहून चळवळ उभी करण्याचा अवघड वसा घेतला होता. त्या कालखंडात. ती त्या वेळी अमेरिकन नागरिक होती. 'लग्न' गुप्तता पाळूनच केलं जाऊ शकत होतं. कारण पकडला गेलो असतो. १०-१२ साथी-मित्र-सहकारी-आई-मामा-मामी-कॉम्रेड्स यांच्या उपस्थितीत कार्यक्रम कॉ. अप्पासाहेब भोसले

आणि कॉम्रेड लीलाताई भोसले यांच्या घरी उरकला. तिला भीती कशी वाटली नाही याचे मला आश्चर्य वाटते राहून-राहून. गेल तशी धाडशी आणि पायी तर पायी फिरून संशोधन करणारी कार्यकर्ती होती. 'वुई विल स्मॅश धिस प्रिझन' (ह्यो तुरुंग फोडायचा हाय गं) हे पुस्तक तिच्या संशोधन उपक्रमातून निर्माण झालं आहे. पुस्तक वाचणाऱ्यांनासुद्धा हे समजणं कठीण जातं की ती तिच्यातली संशोधिका कायम राहून चळवळ उभी करणारी कार्यकर्ती कधी बनली. तिची आणि माझ्या आईची ओळख याच काळातली आहे. आईला ती आधी कार्यकर्ती म्हणूनच आकळली. संशोधिका म्हणून नंतर उलगडत गेली. 'पश्चिम भारतातील सांस्कृतिक बंड - महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ हा गेलचा पीएच.डी. प्रबंध लिहिण्यासाठी गेल खेड्यापाड्यात गेली. चळवळ, कागदपत्रे, पत्रके, वर्तमानपत्रे, पुस्तके जमा करण्यासाठी ती एस. टी. बसने आणि प्रसंगी चालत गेली. सत्यशोधक केंद्रांच्या जुन्या गावांमध्ये. युनिव्हर्सिट्यांच्या लायब्ऱ्या आणि जुन्या संशोधकांची पुस्तके यात डोके खुपसून खरे संशोधन होत नसते हाच तिचा बाणा होता. आणि तो आयुष्यभर कायम राहिला. 'न्यू सोशल मूव्हमेंटस् इन इंडिया' या तिच्या मोठ्या पुस्तकात नव्या सामाजिक चळवळींनी संशोधकांना समृद्ध करणारं काय दिलं आणि भारतातल्या मानवमुक्ती चळवळीमध्ये स्त्रीने कोणती भर टाकली अशी दोन्ही अंग आली आहेत. चळवळींच्या योगदानाचा विचार करताना, त्या चळवळीनी कोणते सामाजिक-आर्थिक-राजकीय बदल घडवले याचा विचार गेलनी  दोन अंगांनी केला. एक म्हणजे यातून जनतेच्या जीवनार्थ कोणते बदल झाले. जनतेची आर्थिक-सामाजिक-राजकीय स्थाने कशा प्रकारे बदलली. ही जनता स्वावलंबी किती बनली. किती प्रमाणात स्वत:चे निर्णय घेऊन प्रवाहाच्या विरुद्ध नवं घडवण्यासाठी वाटचाल करून लागली. प्रत्यक्ष कष्टकरी जनतेतून, स्त्रियांमधून, दलित-बहुजनांमधून किती कार्यकर्ते घडले गेले. दुसरे म्हणजे या चळवळींच्या कृतींमधून, व्यवहारातून त्यांनी घडवून आणलेल्या बदलांमधून सिद्धांताच्या विकासाला कोणती चालना मिळाली. कोणते नवे सिद्धांतच निर्माण होण्यासाठी आवश्यक बीजे तयार झाली. असा विचार करण्याची कुवत निर्माण होणे म्हणजे 'सेंद्रिय-बुद्धिवादी म्हणून स्वत:ला घडवणे.' नव्या शोषण मुक्त समाजाची निर्मिती करण्याची प्रक्रिया पॅरिस कम्यूनच्या उठावातून कामगार, शेतकऱ्यांसह घडवीत होते. त्यातून त्यांनी (त्या व्यवहारातून त्यांनी) दाखवून दिली की, जुन्या भांडवली समाजातील शासन संस्था जशीच्या तशी उपयोगात आणता येणार नाही. तिचे नवे स्वरूप घडवावे लागेल. हे सैद्धांतिक सत्य पुढे आल्याचे कार्ल मार्क्सला कळले आणि त्यांनी आधी मांडलेला सिद्धांत पूर्ण बदलला! हीच दृष्टी गेलची होती. कोणत्या प्रकारचा पोथीवाद व जुन्या सिद्धांतांचे दैवीकरण तिने कधीच मान्य केले नाही.

जातिव्यवस्थेचे शोषण, स्त्रियांचे स्त्री-म्हणून होणारे विशिष्ट शोषण, याविषयी मार्क्सवादी, फुलेवादी आणि आंबेडकरवादी अशा सर्व वैचारिक क्षेत्रांमधला कट्टरतावाद तिने कधीच जुमानला नाही. सर्वांची समीक्षा केली. स्वत:चीही समीक्षा केली. पण ही सर्व समीक्षा तिने हळुवारपणे, प्रेमाने आणि आपुलकीने केली. कारण ती बुद्धाच्या विचाराने सिद्धांताची समीक्षा करीत असे.


''न हि वेरेन वेरानी सम्मन्तीध कुदाचनं।
अवेरेनच सम्मन्ति एस धम्मो सनन्तनो''

या बुद्ध वचनाच्या आशयावर तिची सैद्धांतिक भूमिका आधारलेली होती. तिची जीवनरीत आणि तिची सैद्धांतिक भूमिका या दोन्ही गोष्टींचा पाया म्हणजे हे वचन होते. पक्षीय, संघटनात्मक, वैयक्तिक अभिनिवेश, दुराभिमान, संकुचितवाद यांच्या पलीकडे जाऊन तिने चळवळीचे आणि सैद्धांतिक कार्य केले. म्हणूनच देशभरातील आजची, शोषित जनतेत जन्माला आलेली तरूण-तरुणींची नवी पिढीसुद्धा तिच्यावर जीव ओवाळते. तिच्या प्रचंड प्रेमात आहे जगभर पसरलेली अशी तरुणाई सुद्धा तिच्यावर फिदा आहे. तिची पुस्तके वाचून आणि भाषणे ऐकून निराशेच्या गर्तेतून बाहेर आलेली आमच्या नंतरच्या पिढ्यांमधली तरुण-तरुणी आज तिच्यावर भरभरून लिहितात. अखिल मानवांच्या मुक्तीना 'मोहब्बत पुरा' या धर्तीवर आणण्यासाठी तिच्या 'बेगमपुरा'मधून प्रेरणा घेतात. जणू या सर्वांच्या रूपानं गेलच आपल्यात वावरते आहे आणि ती आम्हा सर्व जगभरातील माणसांमध्ये जिवंत आहे, असेच अनुभवायला येते.

आम्ही दोघांनी अनेक महत्त्वाच्या सैद्धांतिक गोष्टी एकत्र लिहिल्या. एकत्र विचार केला. एकत्रितपणे चळवळीत कार्य करणे आणि लिखाण करणे यातही आमचा रोमान्स सामावलेला होता. आता मी एकटा आहे. तिच्या विना. पण तरीही तिच्यासहच वाटचाल करणे चालूच आहे.

❖❖❖

# कुमार शिराळकर : माणूसपणाच्या वाटेवरचा प्रवासी



■ सुभाष थोरात

२७ ऑगस्ट २२ नेहमीप्रमाणे कुमार नंदुरबारहून पुण्याला आमच्या घरी आला. तेव्हा सकाळचे साडेअकरा वाजले होते. जेव्हापासून त्याचा आजार सुरू झाला तेव्हा तो नेहमी येत असे. ही सामान्य घटना होती. आमच्याकडे मुक्कामाला राहत असे.

त्यादिवशी पुणे घर कामगार संघटनेचे अधिवेशन होते. किरण त्यासाठी गेली होती. मी घरीच होतो. कुमार आला. परंतु मी दार उघडेपर्यंतत्याला उभे राहणे शक्य होत नव्हते. मी ताबडतोब त्याला बेडवर झोपवले. पाणी दिले. तो म्हणाला, पोट खूप दुखतेय. तीन दिवस मी काही खाल्ले नाही. परिस्थिती गंभीर होती मी डॉक्टर ज्ञानेश्वर मोटे यांना फोन केला. तो लगेच आला आणि आम्ही त्याला लगेच हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केले.

२६ ऑगस्टला त्यांने नंदुरबारहून सकाळी ट्रेन पकडली. रात्री उशिरा तो मुंबईला पोहोचला. पण खूप उशीर झाल्यामुळे तो मुंबईत कोणाकडे गेला नाही. व्हीटी स्टेशनवरच थांबला. सकाळची ट्रेन पकडून तो पुण्याला आला. अशा भीषण शारीरिक परिस्थितीत त्यांने हा प्रवास कसा सहन केला असेल? मी त्याबद्दल जेव्हा विचार करतो तेव्हा चक्राहूनच जातो. पण आश्चर्य वाटत नाही. कारण आयुष्यभर आंदोलनात भोगलेल्या हालअपेष्टा, तुरुंगवास, उपासमार, मैलोन मैल चालणे, हा त्याच्या आयुष्याचा अविभाज्य भाग राहिला.

त्याबद्दल त्याने कोणाला काही सांगितलेले ऐकू येत नाही. स्वत:चे कसलेही भांडवल करायचं नाही, आपण स्वीकारलेले काम दृढनिश्चयाने निर्धारपूरक पार पाडायचे, हा त्याचा स्वभाव.

मुक्कामाला यायचा तेव्हा त्याच्याकडे एक छोटी पिशवी असायची. यात कपड्याचे दोन जोड असत. पुढे पाठीवरची बॅग वापरू लागला त्यात त्याला कॉम्प्युटर ठेवता येत असे. रात्री स्वत:चे कपडे धुऊनच तो झोपत असे. खाण्याच्या काही आवडी नाहीत. सकाळी त्याला कपभर दूध आणि एक केळं खायला आवडायचे. त्याला गोड पदार्थ आवडत. तो आला की त्याच्यासाठी गोड पदार्थ आणून ठेवत असू. दिवसातला बराच वेळ तो वाचत असे आणि काम करत राही.

गप्पागोष्टी होत तेव्हा प्रचलित राजकारण, भारतीय तत्त्वज्ञान जातिव्यवस्था त्याबद्दलचे फुले, आंबेडकरांचे विचार, पर्यावरण, शेती या विषयाची विपुल माहिती त्याकडे पाहण्याचा मार्क्सवादी भौतिकवादी दृष्टिकोन अचंबित करणारा असे. त्यात कुठेही विद्वत्तेचा आव नाही. दुसऱ्याचे बोलणे शांतपणे ऐकणे ते तावातावाने खोडून न काढता त्यातील विसंगती समोरच्या माणसाचा आदर राखून व्यक्त करणे हे त्यांचे संवादातील कौशल्य होते. त्यामुळे त्याच्याबरोबर चर्चा या अधिक आनंदाच्या होत असत. या बोलण्यात आपला मोठेपणा सांगणारा एकही शब्द तोंडून कोणी कधी ऐकला नसेल. आजच्या जाहिरातीच्या जमान्यात स्वत:ची जाहिरात न करणारा मी पाहिलेला तो एकमेव राजकीय नेता की ज्याच्याकडे

स्वत:ची जाहिरात करण्यासाठी हजारो गोष्टी होत्या. ज्या त्याने गोरगरीब जनतेच्या खांद्याला खांदा लावून प्रत्यक्ष रस्त्यावर आंदोलन उतरून कमावलेल्या होत्या. त्याच्या पिढीत आणि नंतरच्याही पिढीत इतकं काम कोणी केले असेल हे संभवत नाही. पण जाहिरातीचे तंत्र असेल तर तुम्ही मुंगी मारली तरी वाघ मारण्याचा देखावा उभा करू शकताच. सध्या राजकारणात असे देखावे उभे आहेत.

मार्क्सवादामध्ये डी. क्लास नावाची एक संज्ञा आहे. डी. क्लास झाले पाहिजे असे नेहमी म्हटले जाते. याचा अर्थ तुम्ही जर वरच्या वर्गात जन्माला आला असाल तर तुम्हाला क्रांतिकारक होण्यासाठी या वर्गाच्या सर्व सवयी, सुविधा, राहणीमान त्याच्या विचार-आचार सोडून दिले पाहिजेत आणि तुमची जीवनशैली तुम्ही ज्या गोरगरीब जनतेसाठी लढणार आहात त्यांच्यासारखी केली पाहिजे. भारतात जातिव्यवस्थेमुळे आपल्याला डी. क्लासबरोबरच डी. कास्टचीही कसोटी लावावी लागते. तुम्ही वरच्या जातीत जन्माला आला असाल तर या जातीचे सगळे फायदे, संस्कार, त्यातून येणारा वर्चस्ववाद नाकारला पाहिजे. जाती पल्ल्याड गेले पाहिजे. भारतात माणूसपणाची सुरुवात तिथूनच होते. कुमार या सर्व कसोटीत १००% उतरला. आपल्या पूर्व जातवर्गाच्या संस्कारापासून तो पूर्ण मुक्त होता. माझ्या माहितीतील ते बहुधा एकमेव उदाहरण असेल. एक वेगळाच नवा जन्म झालेला माणूस.

त्यामुळे धुळे जिल्ह्यात झालेल्या एका अत्याचाराच्या घटनेनंतर अंबरसिंग महाराजांनी मटामध्ये 'सातपुडा सात घालतो' असा लेख लिहून तरुणांना साद घातली तेव्हा जे तरुण तेथे गेले त्यात कुमारही होता. सर्व उच्चशिक्षित. काही परतले पण कुमार परतला नाही. त्याने तो संघर्ष खांद्यावर घेतला तो आदिवासीमधलाच एक आदिवासी होऊन गेला. अनेक संघर्ष केले. मार खाल्ला. तुरुंगवास भोगला. दोन पावलावर असलेला मृत्यू अनुभवला. पण तो परतला नाही. तो आदिवासी कुटुंबातील एक म्हणून राहिला. त्यांच्यात रेशनकार्डवर त्यांनी आपले नाव नोंदवले. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या पद्धतीनेच त्याचे दफन झाले. त्या संघर्षमय मातीतच विसावला.

आजार झपाट्याने बळावला. जगण्याच्या सर्व शक्यता नष्ट झाल्या. प्रचंड वेदनांनी शरीर त्रस्त होते. अशा या अवस्थेत मला नंदुरबारला घेऊन चला, अशी त्यांने इच्छा व्यक्त केली. पण ते शक्य नव्हतं. डॉक्टर डी. एल. कराड यांच्या नाशिक येथील हॉस्पिटलमध्ये तो ॲडमिट होता. कामगार युनियनच्या कामाच्या सर्व व्यापातून डॉक्टर डी. एल. कराड यांनी तसेच त्यांचे सहकारी डॉक्टर आणि डॉक्टर ज्ञानेश्वर मोटे त्यांनी त्याला निदान चार दोन महिने तरी सुखाने मिळतील. त्याला नंदुरबारला जाऊन जनतेत मिसळता येईल यासाठी अफाट प्रयत्न केले. दिवस-रात्र त्याच्या प्रकृतीवर बारीक लक्षत ठेवून राहिले.

नंदुरबारला घेऊन जाण्याच्या सर्व शक्यता मावळत गेल्या तसा नंदुरबारवरून नाशिककडे उलटा जनप्रवास सुरू झाला. अश्रूंनी भरलेले डोळे घेऊन मुलाबाळांसकट महिला, तरुण, वयस्क यांचा एक अखंड प्रवाह रोज नाशिकच्या दिशेने वाहू लागला तो त्याच्या अंतिम श्वासापर्यंत थांबला नाही. तो जी स्वप्न घेऊन आणि ती स्वप्न जनतेच्या डोळ्यांत पेरीत तो ज्या पावलाने त्या नंदुरबारच्या मातीत उतरला होता की थांबली होती. त्यांच्या अंतिम प्रवासाला हजारो लोक, ''कुमार भाऊ परत या'' अशा आर्त घोषणा देत होते. ''थांबणार नाही थांबणार नाही, आमची चळवळ थांबणार नाही'' असा निर्धार व्यक्त करत होते. हा निर्धार कुमारनेच त्यांच्यात पेरला होता. एकीकडे हा निर्धार आणि जनतेच्या डोळ्यातून झरणारे अश्रू, अमर होण्याच्या जवळपास असलेल्या कुमारला अपेक्षा दुसरे चांगले काय अभिवादन असू शकेल? बुद्धापासून सुरू झालेल्या मानवाच्या दु:ख मुक्ती लढ्याला परंपरेचा हा पाईक कायम स्मरणात राहील. उद्या शंभर–दोनशे वर्षांनंतर या काळाच्या इतिहासाची पाने उलटताना काळाच्या पटलावर त्याचे नाव झळकत असेल. त्याचा हा लढवय्या वारसा पुढे घेऊन जाणे हीच त्याला योग्य मानवंदना ठरेल.

तो गेला त्या २ ऑक्टोबरच्या रात्री मी त्याला चार ओळींची आदरांजली वाहिली आहे.


हे जग अधिक मानवी बनवण्यासाठी तू अखेरच्या श्वासापर्यंत झगडलास.

बुद्धानंतर पुरेपूर माणूस बनण्याचा प्रयत्न करणाऱ्या मानवांपैकी तू एक होतास.

काळावर कर्तृत्वाचा ठसा उमटवून तू गेलास, आयुष्याचे चीज केलेस.

मरणार तर सर्वच
तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे तू किर्ती रुपे उरशील.
गोरगरिबांच्या हृदयात सदैव जिवंत राहशील.

❖❖❖



# संजीव साने
# सच्चा मित्र व कार्यकर्ता

■ **जगदीश खैरालिया,** सरचिटणीस, श्रमिक जनता संघ

ज्येष्ठ समाजवादी नेते संजीव साने यांचे दि. २८/१०/२०२२ रोजी दीर्घ आजारामुळे निधन झाले. सुमारे ४५ वर्षांपासूनच्या अनेक आठवणी जागा झाल्या. ठाण्यातील खारटन रोडवरील लफाटा चाळीतील गल्लीत येऊन खांद्यावर हात ठेवून सामाजिक भान देणारा संजीव साने यांनी लोकशाही समाजवाद, स्त्री–पुरुष समता, माणुसकी याचे डोस आम्हाला पाजले होते.

आणीबाणीच्या काळात मी दहावीला होतो. हुकूमशाहीमुळे कारभारात शिस्त लागते, अन्याय करणाऱ्यांना लगाम लागतो अशी धारणा असणारा मी. अचानक लोकशाही समाजवाद, बंधुभाव, मानवीय मूल्ये, स्वातंत्र्य याचा विचार करण्यास शिकलो. यात संजीव सानेंचं मार्गदर्शन मोलाचं ठरलं.

राष्ट्र सेवा दल, समता युवा संगठन, समता आंदोलनचे कार्यकर्ते दर आठवड्याला खारटन रोड परिसरात येत. विविध प्रश्नांसह विविध सामाजिक विषयांवर अभ्यासचर्चा तर कधी कधी एखाद्या पुस्तकातील उतारे वाचून त्यावर चर्चा यात संजीव साने यांचे विशेष योगदान असायचे.

संजीव साने यांची आई यमुताई आणि वडील अण्णा साने दोघेही स्वातंत्र्यसैनिक, समाजवादी आणि कामगार नेते असल्याने लहानपणापासून लोकशाही समाजवादी विचारांचे बाळकडू त्यांना मिळाल्याने त्यांची वैचारिक बैठक पक्की होती. अण्णा साने ठाणे नगरपालिका सफाई कामगारांचे नेते असल्याने आणि संजू आमचा मित्र असल्याने अण्णा आणि यमुताई यांचा सहवास आम्हालाही लाभला. मी व बिरपाल भाल अण्णांच्या इतके जवळ होतो की, अण्णांना अग्नी देण्यासाठी संजूनी आम्हा दोघांना पुढे केले होते.

समता आंदोलन ही संघटना म्हणजे संसदबाह्य राजकारण करणारी संघटना होती. त्यामुळे निवडणुकीत प्रत्यक्ष सहभाग नाही, अशी भूमिका घेऊन आम्ही सुमारे पंधरा वर्षे महाराष्ट्रातील/ठाण्यातील टोपली संडास, सफाई कामगारांचे प्रश्न, नामांतर लढा, राखीव जागा / मंडल आयोगसाठीचे लढे, एन्रॉन विरोधी लढा, परित्यक्ता महिलांचे प्रश्न, महागाई, ठाणे महापालिकेतील भ्रष्टाचार, शहर विकासाचे प्रश्न, पर्यावरण संरक्षण आदी विविध प्रकारच्या प्रश्नावर आम्ही लढा देत होतो. समता विचार प्रसारक संस्थेच्या रूपाने रचनात्मक - संस्थात्मक कामाचीही आम्ही उभारणी केली. संजीव साने मात्र समाजवादाच्या राजकीय विचारांनी मुरलेले व्यक्तिमत्त्व होते. त्याचा कल राजकारणाकडे जास्त होता. माझ्यासह अनेक युवा कार्यकर्ते हे संसदबाह्य व समतावादी आग्रह धरणारे होतो. परंतु संजू आणि अन्य वरिष्ठ सहकारी यांच्या आग्रहाखातर १९९५ साली समाजवादी जनपरिषदेत आम्ही सहभागी झालो. तेव्हा बेडेकर कॉलेजमध्ये झालेल्या समाजवादी जनपरिषदेच्या स्थापना अधिवेशनाचे उद्घाटन शकुंतला कजानिया या सफाई कामगार महिलेच्या हस्ते करण्यात आले होते.

संजीव साने यांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात ही राष्ट्र सेवा दलातून झाली. समता युवा संगठन, समता आंदोलन, सोशालिस्ट फ्रंट, समाजवादी जनपरिषद, आम आदमी पार्टी, स्वराज इंडिया, स्वराज अभियान आदी मध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली. महाराष्ट्रातील अनेक आंदोलने, आघाड्या, संघर्ष समित्यांमध्येही संजीव साने यांचं महत्त्वाचे योगदान असायचं. त्यामुळे रिपब्लिकन, कम्युनिस्ट, समाजवादी आणि इतर आंदोलने चळवळीतील कार्यकर्त्यांचा समन्वय व संपर्क केंद्र म्हणजे संजीव साने असायचे.

आपल्या भूमिकेवर ठाम असणारा, परंतु मैत्री जोपासणारा कार्यकर्ता आम्ही गमावला आहे. शोषित, पीडित अथवा आदिवासी घटकातील कार्यकर्ते भेटल्यावर आपुलकीने काही खाल्ले आहे का, अशी विचारपूस करणारा प्रेमळ, मातृहृदयी संजीव आम्ही अनुभवला आहे. संघटनेच्या सुरुवातीच्या काळात तेव्हा हातानेच पत्रव्यवहार, पत्रके, पोस्टर्स आदी करावे लागायचे. संजूचे आणि संजय मंगला गोपाळ यांचे हस्ताक्षर सुंदर असल्याने ही सर्व कामे त्यांनाच करावी लागायची. ठाण्यातील वस्त्यांमध्ये सभा बैठकांसाठी जाण्यासाठी सुरुवातीला आम्हाला दोनच गाड्या असायच्या. एक संजीव साने आणि दुसरी संजय मं. गो. यांची स्कूटर. संजय - संजू म्हणजे आमच्या साठी जय - विरू ! मी मात्र नेहमीच पाठीमागे बसायचो. त्यामुळेच मला कधीच वाहन परवाना काढण्याची गरजच भासली नाही.

रोज रात्री झोपण्यापूर्वी किमान अर्धा एक तास कोणतेही पुस्तक वाचत जा. वाचण्याची सवय होऊन जाईल. संजूचा हा सल्ला मला खूप मोलाचा ठरला आहे.

संजीव साने आज प्रत्यक्षात आपल्या बरोबर नसला तरी आयुष्यात वैचारिक स्पष्टता, मतभिन्नता ठेवून मैत्री जोपासण्याचे त्याचे कसब हे आयुष्यभर सोबत राहणार आहेच!

❖❖❖

# अन्नपूर्णाच्या पेन्शन योजनेने माझे म्हातारपण सुरक्षित केले

■ शांताबाई सांबरे

शांताबाई पुण्याच्या भय्यावाडी, चाफेकरनगर मध्ये राहणाऱ्या. घरकाम करत उदरनिर्वाह करायच्या. अजून काहीतरी जोड-व्यवसाय करावा, जेणेकरून कुटुंब अजून चांगल्या आर्थिक परिस्थितीस नेता येईल, अशी त्यांची प्रबळ इच्छा! पण बाहेरून अण्णा, सावकारकडून कर्ज घेतल्यास व्याजदर प्रचंड. तो काही शांताबाईंना झेपणारा नव्हता.

अन्नपूर्णाच्या ताई अशाच एकदा-दोनदा वस्तीत त्यांना दिसल्या पण कर्जाचा अनुभव खूप चांगला नसल्याने त्या काही पहिल्यांदा अन्नपूर्णा संस्थेबद्दलची माहिती ऐकण्यास गेल्या नाहीत. पण नंतर जेव्हा अन्नपूर्णाच्या ताई येतच राहिल्या. चित्राद्वारे माहिती सांगत होत्या. तेव्हा शांताबाईंनी ती माहिती ऐकायचे ठरवले आणि मग मात्र त्या मनोमन निर्धास्त झाल्या. कोणताच किंतु मनी राहिला नाही. त्यांनी अजून महिलांना एकत्रित करून ताईंची माहिती ऐकण्यास बोलावले, इतकेच नव्हे तर त्या सर्वांचे अन्नपूर्णाच्या गटात रूपांतर झाले.

पहिले कर्ज घेतले आणि शांताबाईंनी जोडधंदा सुरू करून पहिला मनसुबा गाठला. मग अन्नपूर्णाच्या शिकवणीप्रमाणे पैसे किंवा नफा बाजूला टाकू लागल्या आणि पैशाने पैसा वाढत गेला. शांताबाईंनी दुसरे कर्ज घेतले त्यासोबत अन्नपूर्णाच्या इतर सेवा जसे की आर. डी., एफ. डी.चा लाभ घेतला. आता शांताबाईंचा आत्मविश्वास अजून वाढला, तसेच अन्नपूर्णाबद्दलचा विश्वासही! त्यांनी व्यवसायात अधिक भांडवल गुंतवले व व्यवसाय अधिक वाढवला. आता फुलांबरोबर पूजेसाठी लागणाऱ्या वस्तूही विकू लागल्या.

जेव्हा शांताबाईंनी अजून पुढचे कर्ज घेतले तेव्हा अजून एक छोटे दुकान, मुलाची रिक्षा या व्यवसायात वाढ अशी त्यांनी प्रगती केली.

आता आधारपूर्णाने सभासदांचे म्हातारपण सुरक्षित व्हावे यासाठीची लाँग टर्म बचत योजना म्हणजे आधारपूर्णाची सुरुवात केली होती, पण शांताबाई थोड्या संभ्रमात पडल्या, लगेच निर्णय घेण्यास अन्नपूर्णाच्या शिकवणीचीच साथ मिळाली. 'बचत करा' शांताबाईंनी लगेच आधारपूर्णाचा फॉर्म भरला. रेग्युलर कर्जाच्या हप्त्याबरोबरच आधारपूर्णाचे पैसे भरू लागल्या. हे सर्व करत असताना मध्ये मध्ये अनेक व्यावसायिक, तब्येतीच्या अडचणी येत होत्या. पण त्यामध्येही शांताबाई डगमगल्या नाहीत. कारण त्यांच्या बरोबर अन्नपूर्णाची भक्कम साथ होती, जसे की त्यांच्या यजमानांच्या आजारपणाचे अनेक दावे त्यांना मिळाले, अन्नपूर्णाने आर्थिक दावा रूपाने मदत तर दिलीच, पण अन्नपूर्णाच्या डॉक्टरांचे मार्गदर्शनही मिळाले... पण नियतीने साथ न दिल्याने शांताबाईंच्या यजमानांचे प्रयत्नांती निधन झाले. तेव्हा अन्नपूर्णामधून त्यांना कुटुंब सुरक्षा निधीतून आर्थिक मदत मिळाली. ती शांताबाई कधीच विसरू शकत नाहीत.

आज शांताबाई पासष्ट वर्षांच्या झाल्यात. त्यांना आता अन्नपूर्णाची पेन्शन सुरू होईल... असा अन्नपूर्णामधून जेव्हा फोन त्यांच्या सुनेला गेला तेव्हा शांताबाईंच्या मुलाला आणि सुनेला आईचा अभिमान वाटला. आपली एवढी साधी आई, आज तिने स्वत:बरोबरच संपूर्ण कुटुंबाचा विकास केला आणि आता तर ती म्हातारपणी कोणावर अवलंबून नाही,... पण यावर शांताबाई एकच म्हणत होत्या हे सगळं शक्य झाले, ''अन्नपूर्णाची साथ होती म्हणून''...

❖❖❖

# इथे स्वप्न साकार होतात

■ सुरेखा परब

कोकणात वाड्या-वस्तीमध्ये राहिलेली पण मुंबईत जाऊन काही चांगलं नशीब अजमावयाची इच्छा असलेल्या सुरेखाताई लग्न करून मुंबईत आल्या. मिस्टरांची छोटीशी नोकरी, एकूण चार छोटी मुलं सांभाळत संसार सुरू होता. एकाच्या पगारात एवढा मोठा खर्च भागवणे सुरेखाताईंना जड जाऊ लागले. गावी थोडी शेती, घर आहे त्यामुळे गावी पैसे पाठवायचे तेवढी गरज सुरेखाताईंना भासली नाही. पण एका इलेक्ट्रॉनिक कंपनीत 'मावशी'चे काम त्यांना मिळाले. पगाराबरोबर स्टाफलाही खूप सोयी सुविधा होत्या म्हणून त्यांनी ती नोकरी पत्करली. बरेच वर्ष सगळं सुरळीत होतं.

एकदा मिस्टरांना पॅरालिसिसचा अटॅक आला. बरेच दिवस दवा-पाण्यात गेले. मिस्टरांची नोकरी गेली. तीन मुली, एक मुलगा या सगळ्यांचा भार सुरेखाताईंनी पेलला. कारण त्याच कालावधीत अन्नपूर्णाच्या एल.एस.ओ. ताई म्हणजे लोन अँड सेविंग ऑफिसर या कर्जाची माहिती सांगण्यास वस्तीत आल्या. सुरेखाताईंना अन्नपूर्णा फक्त कर्जच देत नाही तर त्याबरोबर इतर आरोग्याची, घरातील सदस्य मृत्यू प्रसंगी आर्थिक सहाय्य देते तसेच बचत करण्यास शिकवते हे खूप आवडलं आमि त्यांच्या डोक्यात अनेक विचार चमकू लागले. आताच्या काळात फक्त नोकरीवर आणि तेही त्यांच्या एकटीच्या, घर चालणार नाही तर काही जोड धंदा केला तर अजून आर्थिक हातभर लागेल, हा विचार करून सुरेखाताईंनी अन्नपूर्णाचे कर्ज घेतले. आणि मटकी - कडधान्य विकण्याचा व्यवसाय सुरू केला. चार वाजता कंपनीतून आल्यावर त्या मटकी आणि कडधान्य विकू लागल्या. आता त्या नवऱ्याचे आजारपण, मुलांचा शाळेचा खर्च भागवू शकत होत्या.

एका पाठोपाठ एक कर्ज संपवून दुसऱ्या कर्जाकडे सुरेखा ताई जात होत्या. अन्नपूर्णाच्या कर्जा मुळे मी व्यवसाय तर सुरू करू शकले पण मिळालेल्या मदतीमुळे मी एकटी मिस्टरांचे आजारपण गेले २० वर्ष पेलवत आहे. तसेच सुरेखाताईंनी अन्नपूर्णाच्या जोरावर ३ मुलींची शिक्षण व लग्न करून दिली आहेत. मुलाचे शिक्षण व लग्न करून दिले आहे. आता बऱ्याच उपचारांनी मिस्टरांना थोडे बरे वाटते आहे. ते थोडे - फार चालू, फिरू शकतात. ते आता मटकी-कडधान्याच्या व्यवसायात सुरेखा ताईंना मदत करतात. सुरेखा ताई सकाळी कंपनीत गेल्यावर तेच व्यवसाय सांभाळतात.

३ मुली लग्नाहून सासरी जातील, मुलगा - सून आपल्याला सांभाळतील पण सुरेखा ताईंनी म्हातारपणासाठी कोणावर अवलंबून राहायला नको म्हणून अन्नपूर्णा तील आधारपूर्णात रक्कम भरली पण एवढ्य कष्टानंतर काहीतरी चांगली पेन्शन मिळावी म्हणून सुरेखा आधारपूर्णाची वर्गणी वाढवून ५००/- रु. केली. आता त्यांना पेन्शनचा परतावा मिळण्यास सुरूवात झाली आहे. त्यातही त्या सेविंग करून ठेवतात, मुलांना, नातवंडांनी लागले तर पैसे देतात.

एक स्त्री अख्खा संसार, नोकरी आणि व्यवसाय करून उभा करू शकते. आजारी नवरा, एकूण ४ मुलं सांभाळून त्यांना त्यांच्या पायावर उभं करू शकते. माझ्यातले हे स्त्रीचे रुप अन्नपूर्णा मुळेच घडले असे सुरेखाताई आवर्जून सांगतात.

एका खेडेगावातील सामान्य स्त्रीचे मुंबईत येण्याचे व जगण्याचे स्वप्न अन्नपूर्णामुळे साकार झाले, असे सुरेखाताई आनंदाने सरते शेवटी सांगतात.

❖❖❖

# अन्नपूर्णा वार्तापत्र

■ **अंजली पाटील**

**नमस्कार बंधू -भगिनींनो...**

दीपावलीच्या सुट्ट्या संपवून आपण सगळे परत कामाला लागलो आहोत. या वेळी सुट्टी भरपूर ६ दिवस होती. दिवाळी कुटुंबीयासोबत मजेत घालवली ना आणि फ्रेश मनाने परत काम सुरू केले आहे ना. दिवाळीपूर्वी वेळ कमी होता म्हणून कामं खूपच घाईने उरकावी लागली होती. फील्डवर कर्ज, हप्ता वसुली, त्यामुळे बॅक ऑफिसवरही सगळी कामे आधीच्या तारखेला करावी लागली. परंतु सगळे व्यवस्थित संपवून दिवाळीची मजाही लुटता आली सर्वांना. कामाचे टेंशन नव्हते ना.

ऑगस्टच्या संवादमधे जाता जाता मी तुम्हाला फाउंडर्स डे आपला १८ ऑगस्ट दादा पुरव स्मृतिदिन याबद्दल सांगितले होते. आता सविस्तर सांगते.

या वेळी हा दिवस साजरा करायचा, तोही जरा वाजत गाजत, असे ताईंच्या मनात होते. आज भारतात जे काही चालले आहे, धर्म, जातीयवाद, लोकांच्या मनात नकारात्मक विचार पसरवले जात आहेत. खरे तर भारत देश, त्याचे संविधान आपल्याला धर्मनिरपेक्षता शिकवते. अंमलात आणायला लावते. तरीही आजची परिस्थिती वेगळेच सांगते आहे. म्हणून या विषयावर बोलायला हवे, लिहायला हवे. अन्नपूर्णा म्हणून ती आपली जबाबदारी आहे असे सर्वांचे एकमत झाले आणि विषय ठरला. 'धर्म आणि संविधान' हे पुस्तक श्री. सुरेश सावंत यांनी लिहिले आहे. अतिशय साध्या सोप्या भाषेत धर्म कधी सुरू झाला, त्याची आवश्यकता किती आहे, कोणत्या देशात धर्माचे महत्त्व कसे आहे, आणि हे सगळे फक्त त्यांचे विचार नाही, त्यासाठी भरपूर वाचन करून त्यांनी वेगवेगळे रेफरन्स दिले आहेत आणि कोणीही वाचायला घेतले तरी कंटाळवाणे न होता उत्सुकतेने आपण पुस्तक पूर्ण करतोच. त्याला कोणताही नकारात्मक विचार न देता सुरेश सावंत यांनी हे पुस्तक लिहिले आहे.

त्या आधी ह्या विषयावर आपण वेगवेगळ्या दिग्गज लोकांची ही मतं घेतली. त्या विषयावर त्यांना त्यांची मतं व्यक्त करायला आपले व्यासपीठ मिळवून दिले.

श्री. प्रमोद मुजुमदार पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. श्री. संकेत मुनोत यांनी म. गांधी आणि धर्म यावर अत्यंत सुंदर भाष्य केले. श्रीमती नीलम पंडित यांनी हिंदू धर्म कसा वेगवेगळ्या पद्धतीने सुंदर रीतीने भारतात वापरला जातो ह्याची उदाहरणे दिली. श्री. परिमल यांनी दलित आणि धर्म यावर छान प्रकाश टाकला. श्रीमती तमन्ना इनामदार यांनी मुस्लीम धर्माविषयी खूप गोष्टी कथन केल्या. श्री. प्रशांत केदारी यांनी ख्रिस्ती धर्माविषयी, त्याचा विस्तार कसा झाला, का झाला या विषयी आपले मत व्यक्त केले.

अशा प्रकारे धर्म या विषयावर सर्वांनी आपले मत व्यक्त केले. धर्म हा सर्वसमावेशक असतो. माझा माझ्यापुरता तो असावा. इतरांना त्याचा त्रास होऊ नये असा धर्म असावा. असेच यातून सारांश निघत आहे. जे आपले संविधान सांगतो. धर्म सर्वांना समान वागणूक देणारा असा असावा.

ह्याच दिवशी आपण सुवास्तू ह्या सध्याच्या इमारती वरील अजून ६ मजले जे अन्नपूर्णाने विकत घेतले, त्याचे उद्घाटनही केले.

ह्या प्रोग्रामसाठी या वेळी आपण पुणे शहरातील प्रसिद्ध वृत्तपत्रांचे संपादक खास बोलावले होते. पुणे शहरात अन्नपूर्णा परिवार तळा गाळातील व्यक्तींसाठी काय काम करते, त्यांचे प्रश्न काय आहेत.

त्याकडे मीडियाचे लक्ष आहे का. ह्यासाठी मुलाखत आयोजित केली होती. सकाळ वृत्तपत्राचे संपादक सम्राट फडणीस, महाराष्ट्र टाइम्स चे श्रीधर लोणी आणि लोकमतचे संजय आवटे यांनी आपल्या महिला प्रतिनिधींशी संवाद साधला. आपले प्रश्न समजावून घेतले. त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली की एवढे चांगले काम पुण्यात सुरू आहे. पण मीडिया ह्याची दखल घेत नाही. परंतु आता असे होणार नाही, ह्यासाठी आम्ही प्रयत्न नक्की करणार.

सम्राट फडणीस म्हणाले,पारंपरिक मीडिया दखल घेत नाही तर तुम्ही स्वत:चे मीडिया पेज उघडावे. आम्ही ही बातमी देण्याचा प्रयत्न नक्कीच करू.

संजय आवटे यांनी सावकारी पाशातून महिलांची सुटका करून त्यांना स्वत:च्या पायावर सक्षमपणाने उभे राहण्यासाठी हात दिल्याबद्दल अन्नपूर्णा परिवाराचे अभिनंदन केले.

श्रीधर लोणी यांनी सांगितले की, अशा संस्थांची अत्यंत गरज आहे आणि अन्नपूर्णा देशातील एक आदर्श मॉडेल आहे. अश्या भावना सर्वांनी व्यक्त केल्या.

गोखले इन्स्टिट्यूट आणि अन्नपूर्णा परिवारचे वतीने एक कार्यक्रम घेतला होता. श्री. रानडे आणि श्रीमती ललितागौरी कुलकर्णी या वेळी उपस्थित होते. दररोज बदलणारी टेक्नॉलॉजी आणि समाज...यावर ललितागौरी यांनी अन्नपूर्णा परिवारच्या सभासद मोबाइलचा वापर कशा प्रकारे करतात, असा एक सर्व्हे घेतला होता. वस्ती वस्तीमधे जाऊन मुलाखती घेतल्या आणि चांगल्या प्रकारे ह्याचा उपयोग महिला करतात. त्यातील जवळजवळ ३५% बँकिंग सुविधा वापरतात. काहींना त्यासाठी भीती वाटते, असेही सांगितले. गोखले इन्स्टिट्यूट आणि दादा पुरव रिसर्च इन्स्टिट्यूट मिळून एक नवीन प्रोजेक्ट हाती घेणार आहेत. त्याविषयी तुम्हाला सांगूच.

आपण सगळे जाणतो आहोत की, दोन वर्षे मधे कोरोनामुळे सगळेच ठप्प होते. एकत्रित येण्यास बंदी होती. त्यामुळे वस्ती मधील आपली सभासद मीटिंग, हो हो, कम्युनिटी मीटिंग आपण घेऊ शकलो नव्हतो. आता ती घेण्याचा निर्णय ताईंनी सर्वांशी चर्चा करून घेतला आहे.

ज्या सभासदांचे पुढच्या महिन्यामध्ये किंवा पुढच्या तीन महिन्यांमध्ये कर्ज आहे अशा सभासदांना एलएसओ शेवटच्या हप्त्याला पुनर्भेट करून कम्युनिटी मीटिंगसाठी आमंत्रण देणार आहेत आणि महिन्याच्या दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या शनिवारी ही कम्युनिटी मीटिंग आपण प्रत्येक ब्रांच ऑफिसमध्ये घेणार आहोत.

गेले दोन वर्षांमध्ये कोरोनामुळे कोणतीच मीटिंग प्रत्यक्ष न झाल्याने आणि कम्युनिटी मीटिंगही आपण घेतली नसल्याने नवीन वस्ती प्रतिनिधीची नियुक्तीही झालेली नव्हती. त्यामुळे आहे तेच वस्ती प्रतिनिधी पुढील वर्षासाठी मंजूर केले गेले. परंतु नोव्हेंबर २२ ह्या महिन्याच्या कम्युनिटी मीटिंगमध्ये आपण नवीन वस्ती प्रतिनिधीची निवड करणार आहोत. कम्युनिटी मीटिंगमध्ये आणि वार्षिक मीटिंगमध्ये त्या प्रतिनिधींचे स्वागत आपण करणार आहोत. असेही ठरले आहे.

अन्नपूर्णाच्या वस्ती प्रतिनिधी मधून दोन वस्ती प्रतिनिधी आपण अन्नपूर्णा महिला को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या बोर्डवर घेत असतो. ऑगस्ट महिन्याच्या बोर्ड मीटिंगमध्ये जुन्या बोर्ड मेंबर बदलून आपण नवीन दोन बोर्ड मेंबर नियुक्त केल्या आहेत. पुण्याच्या वर्षा गायकवाड यांच्या जागी अनिता कांधरे आणि मुंबईच्या सविता वालवटकर यांचे जागी श्वेता कांबळे आणि सिग्नेटरी पण बदलल्या आहेत. हे तुम्हाला माहीत असावयास हवे.

आताच्या बोर्ड मेंबर आहेत...त्या पुढील दोन वर्षे कामकाज पाहतील.

दरवर्षी आपण स्टाफची इव्हॅल्युअेशन ट्रिप डिसेंबर महिन्यामध्ये पहिल्या आठवड्यामध्ये घेत असतो. दोन वर्षे ती झूमने झाली. पण या वर्षी ही ट्रीप आपण ३ डिसेंबरला प्रत्यक्ष घेणार आहोत. लोणावळ्याच्या जवळ आपण पुणे आणि मुंबई चे सगळे फील्ड स्टाफ, बॅक ऑफिस, पाळणाघर संचालिका, मदतनीस, बोर्ड मेंबर सगळ्यां सोबत एकत्र जाणार आहोत. पहिल्या सत्रात कामाचा आढावा, सिंहावलोकन करून दुपारनंतर स्टाफ मजा करतील. विविध गुण दर्शन होईल. तुम्हाला तुमच्यामध्ये असणारे गुण दाखविण्याची छान संधी मिळेल. लागा तयारीला मग.

सभासद प्रतिनिधी म्हणजे सीआर यांचीही सहल आपण वर्षातून एकदा नेत असतो. कोविडमुळे ती आपल्याला घेणं शक्य झालं नाही. परंतु या वर्षी मात्र एप्रिलनंतर आपण ही सहल नक्की घेवून जाणार आहोत. त्यामुळे वस्ती प्रतिनिधींना ही एकत्र शेअरिंग, नवीन स्थळाची माहिती, एकत्रित गाणी गप्पा, ज्यामधून त्याही दररोजच्या धकाधकीमधून मन प्रसन्न करून पुढील कामाला छान सुरुवात करतील.

आपण सभासदांना जे कर्ज देतो त्या कर्जाचा व्याजाचा दर हा फिक्स व्याजदर होता. परंतु १ जानेवारीपासून आपण हा व्याजाचा दर उतरत्या पद्धतीने करणार आहोत. यासाठी आपल्या सॉफ्टवेअर टीमला नवीन डेव्हलपमेंट करण्यास सांगितले आहे. त्याबाबत सूचना तुम्हाला आणि सभासदांना दिल्या जातील.

आपली दिवाळीसाठीची कर्ज या वेळी नेहमीच्या मानाने कमी झाली. पण कोरोनानंतर चा काळ पाहता कर्ज संख्या हळूहळू वाढत आहे. ती नक्की वाढली पाहिजे. जुने मेंबर्स परत आले पाहिजे. ह्यासाठी तुम्ही सर्वांनी प्रयत्न वाढवले पाहिजे. वस्तीमधे जाऊन सभासदांना भेटले पाहिजे. त्यांचे भले कशात आहे हे सांगितले पाहिजे. आज कर्ज देणाऱ्या संस्थांचा सुळसुळाट आहे. पण कायम हात देणारी एकच आहे... अन्नपूर्णा. ह्यासाठी

मेधाताई, उज्वलाताई आणि आरतीताई सिस्टीम सोपी करण्याचा दिवसरात्र प्रयत्न करत आहेत. वेगवेगळे रिपोर्ट तुम्हाला देत आहेत. त्याचा उपयोग करून सभासद वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

फील्डवरील रोजची रिकव्हरी केल्यानंतर संध्याकाळी डीसीएस आणि बीसीएस भरायला स्टाफला अवघड पडते आहे. ते सोपे जावे यासाठी सह्याद्री टीमकडून आपण पुढील डेव्हलपमेंट ॲपपूर्णामध्ये करून घेणार आहोत. साधारण जानेवारी २०२३ पासून फील्डला हे वापरायला मिळेल असे वाटते. तशा सूचना तुम्हाला मिळतील.

ह्यातील बदल करण्यासाठी आपल्याला सॉफ्टवेअरची टीम मदत करत आहे. ही सगळी अन्नपूर्णाचीच टीम आहे.

ह्या सॉफ्टवेअर टीममध्ये नवीन नवीन स्टाफ घेणे गरजेचे असते. कारण आपल्या गरजा ह्या दररोज वाढतच आहेत.

आपले काम नवनवीन टेक्नॉलॉजीचा अधिकाधिक वापर करून, होणाऱ्या चुका कमी करून, काम सोपे करण्याचा प्रयत्न मेधाताई कायम करत असतात. त्यामुळे सॉफ्टवेअर टीम ही वाढवणे गरजेचे आहे.

परंतु सॉफ्टवेअर टीममध्ये स्टाफ मिळणं थोडंसं अवघड जातं म्हणून आपण आपल्याकडे असलेल्या जुन्या संस्थेचे नाव बदलून पूर्णा इ-सोल्युशन फाउंडेशन या नावाने नवीन रजिस्ट्रेशन घेतले आहे. याची आपण वेगळी वेबसाइट बनवून घेतलेली आहे आणि सर्व सॉफ्टवेअर स्टाफ ह्याच कंपनीमधून काम करतील. त्यांचे सर्व कामकाज ह्याच कंपनीमधून यापुढे चालेल.

तुम्हाला माहीत आहे की, आता कर्ज प्रक्रिया आणि आरोग्य क्लेम सर्व काम ॲपपूर्णामधून होते. त्यामुळे आरोग्य क्लेम सभासदाने पाठवला की ॲपपूर्णामधून तो लगेच हेड ऑफिसला मिळतो, त्यावर स्क्रुटिनी होऊन ३, ४ दिवसांतच तो सभासदाच्या अकाउंटला पैसे ट्रान्स्फर केले जातात. अशा रीतीने हेही काम खूप सोपे झाले आहे. यामुळे सभासदांच्या तक्रारी कमी होतील. क्लेम उशिरा मिळणार नाही. सर्व कागदपत्र मात्र व्यवस्थित पाठवणे फील्डचे काम आहे. लवकरच कुटुंब विमा आणि मृत्यू विमाचेही काम पूर्णत्वास जाईल.

आधारपूर्णाचे खाते सुरू करण्यासाठीची वयोमर्यादा ५५ वर्षे आहे. परंतु त्या पुढील वयातील सभासदांना या योजनेत सहभागी होण्याची इच्छा असते पण वयोमर्यादेमुळे ते आधारपूर्णा सुरू करू शकत नाही. त्यांना जानेवारी २०२३ पासून या योजनेत सहभागी होता येईल. अशी तरतूद मेधाताई तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार करत आहेत. यासाठी काही बदल सिस्टीममध्ये करावे लागतील. त्यावर काम करणारी टीम, एफ एक्स आणि टीम, विचार करून सिस्टीम त्यायोगे बदलवून देतील. नव्या वर्षात आपण असे नक्की करू शकू असे वाटते. छान आयडिया आहे ना. मला तर खूप आवडली. तुम्हाला आवडली का...

तुम्हाला हे तर माहीत आहेच की, आपल्या पुण्याच्या शांता सांबरे आणि शोभा खबाले यांना आणि मुंबईच्या सुरेखा परब यांना पेन्शन सुरू झाली आहे. दर ३ महिन्याला काही रक्कम त्यांच्या अकाउंटला जमा होते आहे. ह्या तिघींचे आपण स्वागत करू या. त्यांना ऑफिसला बोलावून आपण त्यांचे अभिनंदन केले तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. अगदी भरभरून बोलत होत्या त्या. खबाले ताई म्हणाल्या, छोट्या व्यवसायमधून माझं सारे घर आज खूप विकास पावले आहे. मुलगी, मुलगा शिक्षण घेऊन स्वतः:च्या पायावर उभे आहेत. पीसीओपासून झेरॉक्स मशीन, पेप्सी विकणे असे कोणतेही काम करण्यात कमीपणा न मानता मी आणि माझे सगळे कुटुंब अन्नपूर्णा मुळे आज खूप सुखी आहोत आणि इतके देऊन वर मला आज रिटायर झाल्यावर माझी हक्काची पेन्शनही आता मिळणार आहे ह्याचा मला खूप आनंद होतो आहे. हे बोलत असताना अभिमान आणि आनंद त्यांचे चेहऱ्यावर ओसंडून वहात होता. खूप तृप्त चेहरा होता तो.

आणि अशाच अनेकांच्या चेहऱ्यावर तो आनंद आपल्याला पाहावयाचा आहे. मेधाताईंचे हे स्वप्न पूर्ण होत आहे ह्याचा त्यांनाही खूप आनंद आणि समाधान वाटत होते.

आपल्या पाळणाघरात नवनवीन प्रयोग चालू असतात. सणवार उत्सव साजरे केले जातात. मुलांना गाणी, गोष्टी सांगितल्या जातात. या वर्षी वात्सल्यापूर्णा प्रकल्पासाठी, म्हणजे मुलांसाठी पुस्तक खरेदी केली. सुजाताताईंनी गोष्टींची पुस्तके खरेदी केली. वाचनाने जग आपल्यासमोर उभे राहते. लहानपणीच वाचनाची आवड लागली की, मुलं पुस्तक वाचायला शिकतात. नव्या तंत्रज्ञानामुळे हल्ली वाचन खूप कमी करतात मुलं. वाचनाची छान सवय लागावी मुलांना. जगाकडे उत्सुकतेने पाहण्यासाठी पुस्तकं हा सुंदर पर्याय आहे. म्हणून पाळणाघरात खूप छान छान पुस्तकांची खरेदी झाली. मुलं आणि ताया पण खूप खूश झाल्या.

हा लेख आपल्या संवाद त्रैमासिकमध्ये डिसेंबरला प्रसिद्ध होईल. २ डिसेंबरला आपली बोर्ड मीटिंग आहे आणि ३ तारखेला ट्रिप. त्याचे डिटेल्स तुम्हाला पुढील अंकात वाचायला मिळतील. तुम्ही केलेली मजा आठवून नक्की हसायला येईल तुम्हाला. दोन वर्षे झूमने ट्रिप झाली. सर्वांना एकत्रित भेटणे अशक्य होते. पण या वर्षी ही धमाल पुन्हा सुरू. तयारी सुरू झाली का तुमच्या प्रोजेक्ट प्रेझेंटेशनची. मस्त करा ह...

सप्टेंबर महिन्यात नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने लोकमत ने नवगौरी पुरस्कार अन्नपूर्णा परिवारला दिला. सामाजिक कामाचा हा पुरस्कार मेधाताईंनी स्वीकारला. त्यावेळी वस्ती प्रतिनिधी आणि

ब्रांच मॅनेजर ताईंसोबत हजर होते.

आता सर्वांनाच उत्सुकता आहे वार्षिक मीटिंग म्हणजे आपल्या वार्षिक सभेची. ए.जी.एम.ची. कारण त्याच वेळी आपण सर्व सभासदांना एकत्रित भेटतो. मेधाताई त्यांना ह्याच मीटिंगला भेटतात. त्यांच्या बरोबर संवाद साधत, त्यांच्या अडचणी स्वत: ऐकतात, त्यातून ऑफिसमध्ये, नियमांमध्ये काही बदल करायचे का, सिस्टीम सोपी कशी पडेल ह्यावर ताईचे मंथन सुरू होते. तो एक प्रेक्षणीय सोहळा असतो. ताई खाली स्टेजवर मस्त मांडी घालून बसतात. सभासद घोळका घालून त्यांना अक्षरश: घेरतात. आणि सुरू होतो एक संवाद... दोन जीव जसे काही खूप काळाने भेटतात आणि किती भेटू आणि किती नको असे दोघांनाही होते. ही गर्दी संपण्याचे नाव घेत नाही. सर्वांनाच त्यांच्या विठूचे दर्शन घ्यायचे असते. गळाभेट घ्यायची असते.

तर सांगण्याचा उद्देश... चला लागा तयारीला...

पुणे मधे हा सोहळा आहे २८ जानेवारी २०२३

आणि मुंबईमध्ये २१ जानेवारी २०२३ ला.

ह्याचे आँखो देखा हाल... पुढील संवादमधे.

मैत्रिणींनो तुम्हाला माहीत आहेच, आजच्या भारतातील परिस्थिती बद्दल. सगळीकडे प्रेमाऐवजी एकमेकांबद्दल अविश्वास, राग, असेच वातावरण आहे. ७ नोव्हेंबरपासून महाराष्ट्रामध्ये प्रवेश करून नांदेडमध्ये 'नफरत छोडो, भारत जोडो!' हा संदेश घेऊन राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या कन्याकुमारी ते काश्मीर या पदयात्रेत आपल्या वृषालीताई आणि अजित मगदूम सर सहभागी झाले होते. नायगाव ते साईराज पेट्रोल पंपपर्यंत चालले. पुढे सायंकाळी MIDC कृष्णूर येथील भव्य सभा झाली. ती त्यांनी ऐकली. पदयात्रेबद्दल बोलायचं झालं तर एक अभूतपूर्व स्वयंस्फूर्तीने लोटलेला 'जनांचा प्रवाहो'. गावोगावी हमरस्त्याच्या दुतर्फा उभं राहून तासतास वाट पाहून लोक राहुलना अभिवादन करत होते. लोकांच्या भेटण्याच्या, अधिकतर पाहण्याच्या असोशीत द्वेष-भयमुक्त देश, लोकशाही, संविधानाच्या सुरक्षिततेची आश्वस्तता दिसत होती. असे वृषालीताई यांनी सांगितले.

पुण्यातही ठिकठिकाणी या पदयात्रेला पाठिंबा दर्शविणाऱ्या यात्रेमध्ये अन्नपूर्णा सभासद सहभागी झाले. ही यात्रा आहे प्रत्येकाच्या मनात एकमेकांबद्दल प्रेम जागृत करणे, मानवता जागवणे, संविधान वाचवणे यासाठी. याचा नाराच आहे 'नफरत छोडो भारत जोडो' आपण पाहतो आहोत, आज मीडियाने ह्याकडे दुर्लक्ष केले आहे. पण आपण सुजाण नागरिक आहोत. अन्नपूर्णा परिवार म्हणूनच ह्याकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काहीतरी चांगले घडेल असे पाहतो आहे.

तीच आशा घेऊन आपण नक्की पुढे चालू या...

थांबते.

अंजलीताई.

❖❖❖


## कविता

# जीवन हे सुंदर आहे

जीवन हे सुंदर आहे
खरंच जीवन हे खूप सुंदर आहे.
जीवन हे गुलाबाच्या फुलासारखं सुंदर आहे.
कधी कोमल, तर कधी काटेरी
पण खरंच जीवन हे खूप सुंदर आहे.
जीवन हे आभाळाएवढं मोठं आहे.
कधी निरभ्र, तर कधी स्वच्छंद करणाऱ्या पाखरासारखं
खरंच जीवन हे खूप सुंदर आहे...
जीवन हे वटवृक्षासारखं आहे.
कधी पारंब्या, फांद्या तर कधी पान, फुलं
पण खरंच जीवन हे खूप सुंदर आहे
जीवन हे अफाट समुद्रासारखं आहे
कधी झुळझुळत्या पाण्यासारखं तर कधी सळसळत्या लाटांसारखं
पण खरंच जीवन हे सुंदर आहे...
जीवन हे दिव्यासारखं आहे, कधी प्रकाश तर कधी अंधार
पण खरंच जीवन हे सुंदर आहे...
जीवन हे काचेसारखं आहे, जीवन हे पाण्यासारखं आहे.
तसेच जीवन हे इंद्रधनुष्यासारखं आहे
पण खरंच जीवन हे सुंदर आहे.
जीवन हे पाण्यात भिजलेल्या धरणीमातेसारखं आहे
जीवन हे फुललेल्या हिरवळीसारखं आहे
पण खरंच जीवन हे खूप सुंदर आहे.
जीवन हे शिदोरीचं रूप आहे
कधी सुखाचे क्षण, तर कधी दु:खाचे क्षण
पण खरंच जीवन हे खूप सुंदर आहे.
जीवन ही एक लाखमोलाची पेटी आहे
कधी हिरा, तर कधी मोती, कधी सोनं, तर कधी चांदी
पण खरंच जीवन हे खूप सुंदर आहे
जीवनात येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती या शंख-शिंपल्यासारख्या आहेत
जीवन हे जगण्या-मरण्याचा खेळ आहे
पण खरंच जीवन हे खूप सुंदर आहे.
जीवन हे एक खूप सुंदर विश्‍व आहे
खरंच जीवन हे आनंदाने जगणं हेच
तर खरं जीवन आहे
हेच तर खरं जीवन आहे!

**- दीपाली भरत गायकर**

❖❖❖


ANNAPURNA PARIWAR
Dada Purao Research and Training Institute














अन्नपूर्णा परिवार







































अन्नपूर्णा परिवारातर्फे श्री. सुरेश धोपेश्वरकर यांनी संवाद त्रैमासिक न्यू एज प्रिंटींग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.